**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६२२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निलेश विलासराव नागोसे<br>C/o, आदिवासी कॉलनी, वार्ड नं.२, पो. मानसमंदिर<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय वर्धा.<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका<br>लोक विदयालय, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, लोक विद्यालय, वर्धा श्रीमती वसुधा प्र. इंगळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद वर्धा श्री सोनवणे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२१/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका लोक विद्यालय वर्धा यांचेकडे लोक विद्यालय वर्धा येथे सन २०११-१२ मध्ये नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यात शिक्षकेत्तर सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यां बाबत त्यांनी माहिती मागितली होती. त्यामध्ये प्रामुख्याने श्री थुल लेबारेटरी अस्सिटंट, श्री देशमुख हेडक्लार्क इ. ची माहिती मागितली आहे. परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.२५/०१/२०११ रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केले. त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्रीमती वसुधा इंगळे हया हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद वर्धा हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्रीमती वसुधा इंगळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या शाळेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविण्यात आल्याचे सांगितले. आणि सदरची माहिती अपीलार्थीस पोस्टाद्वारे पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर दाखविला.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद वर्धा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेण्यात आली आणि त्यामध्ये अपीलार्थीस त्वरीत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे सांगितले. तथापी अपीलार्थीस सदर माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. म्हणून मुख्याध्यापिका यांनी अपीलार्थीस नोंदणीकृत डाकेने पाठविलेल्या पत्राची एक ज्यादा प्रत अपीलार्थीस आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगासमोर प्राप्त केली आणि माहिती प्राप्त झाल्याबद्यल समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.  अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६०८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ॲड. अविनाश भास्करराव भट<br>४२०-अ, हनुमाननगर नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ००९. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता ॲड. अविनाश भास्करराव भट हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास श्री निशीकांत सुके हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास तर्फे श्री आनंद कुमार हे हजर आहेत.

२.     अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.११/०२/२०११ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे मौजा वांजरा ता. नागपूर येथील खसरा नं. २०/१ख ही जमीन अधिग्रहणासंबंधि कधी व केव्हा अधिग्रहीत करण्यात आली ? या जमीनीचा मोबदला किती व कधी देण्यात आला आणि कोणाला कधी आवंटीत करण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२८/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपणास आपल्या कोणत्या भुसंपादन प्रकरणांशी संबंधित माहिती हवी आहे याबाबत स्पष्ट खुलासा केला नसल्यामुळे माहिती देता येवू शकत नाही. कृपया उपरोक्त मौजा मधील भूसंपादन प्रकरण क्रमांक आणि खसरा क्रमांकाचा उल्लेख करुन तसे हया कार्यालयास कळवावे.

मात्र याबाबत जमीनीच्या भूसंपादना विषयी अपीलकर्ता यांचेकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी यांना देता आली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. तथापी सदरच्या जमीनीवर नागपूर सुधार प्रन्यास यांनी बांधकाम केलेले आहे असे देखील त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३.     जनमाहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी श्री निशिकांत सुके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.११/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१४/०२/२०११ रोजी प्राप्त झ ाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने मौजा वांजरा येथील २०/१ ख येथील जमीन अधिग्रहण संबंधित माहिती मागितली होती. त्यामध्ये ही जमीन कधी अधिगृहीत करण्यात आली तसेच जमीनीचा मोबदला कधी आणि किती देण्यात आला इ. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती त्यांनी मागितली होती. त्याला अनुसरुन अपीलार्थीस त्यांनी दि.२८/०२/२०११ रोजी असे उत्तर पाठविले की, आपण मागणी केलेल्या भुसंपादन प्रकरणाचा क्रमांक आणि खसरा क्रमांक कळवावा किंवा याबाबत कार्यालयीन वेळेत निश्चित स्वरुपात कोणती माहिती पाहिजे आहे यासाठी संपर्क साधावा. तथापी अपीलार्थीने भुसंपादन प्रकरणाचा क्रमांक इत्यादीचा तपशिल दिलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेला खसरा क्रमांक २०/१ ख ही मालमत्ता महसूल विभागाकडील अधिकार

अभिलेखात ७/१२ च्या उताऱ्यावर खाजगी मालकीची दिसून येते. तसेच खसरा क्रमांक २०/१ ख बाबत भुसंपादनाची कार्यवाही त्यांच्या कार्यालयाकडून करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, मौजा वांजरा येथील खसरा क्रमांक २०/१ ख ही मालमत्ता महसूल विभागाकडील अधिकार अभिलेखातील ७/१२ च्या उताऱ्यात खाजगी मालकीची असल्याचे दिसून येते. तसेच खसरा क्र.२०/१ ख ही मालमत्ता विशेष भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालयाकडून संपादित झालेली दिसून येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून ही वस्तूस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ८ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी महसूल विभागाकडील अभिलेखातील ७/१२ च्या उताऱ्यात सदरची मालमत्ता खाजगी मालकीची दिसून येते. तसेच सदर मालमत्ता त्यांच्या कार्यालयाकडून संपादित झाल्याची कागदपत्रे दिसून येत नाही असे अपीलार्थीस विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६०७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेशप्रसाद रामप्रसादजी शुक्ला<br>भऊआ कुटी, राष्ट्रसंत वार्ड, आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (अंगणवाडी)<br>एकात्मिक बालविकास सेवा योजना, मुंबई<br>रायगड भवन, पहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी प्रकल्प)<br>वर्धा.<br>सुभेदार बिल्डिंग, केळकर वाडी, आर्वी रोड, वर्धा. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प वर्धा श्री नितीन माहुर्ले हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (अंगणवाडी) एकात्मिक बालविकास योजना मुंबई यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

२. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१४/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी प्रकल्प) वर्धा येथे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नागरी प्रकल्प आर्वी या प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडी सेवीका व मदतनीस या पदांसाठी पात्र उमेदवारांच्या संबंधित माहिती मागितली होती. पंरतू त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.०९/०५/२०१० रोजी उप आयुक्त (अंगणवाडी) एकात्मिक बालविकास सेवा योजना मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. म्हणून त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी वर्धा श्री नितीन मोहुर्ले हे उपस्थित आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे त्यांनाच प्राधिकृत केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१४/१२/२००९ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०१/०२/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही संकलीत करण्यात आली आणि माहितीचे एकूण पेजेस २३४४ असल्यामुळे प्रती पेज रु. २/- प्रमाणे एकूण रु.४६८८/- शुल्क भरणा करणे बाबत दि.१७/०२/२०१० च्या पत्रान्वये कळविले. सदरचे पत्र अपीलार्थीस यूपीसीने पाठविल्याचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला. मात्र सदर शुल्क भरण्याबाबतचे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील मुळ जावक रजिस्टर पाहिले असता सदर पत्र पाठविल्याची नोंद दिसून येते. परंतू अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा केले नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र त्यांनतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उप आयुक्त (अंगणवाडी) एकात्मिक बालविकास योजना मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. तथापी त्यानंतर त्या कार्यालयाचे मुंबईवरुन पूणे येथे स्थांनांतरण झाल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देता आला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०१/०२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्यानंतर अपीलकर्त्यास दि.१७/०२/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु.४६८८/- भरण्याबाबत यूपीसीने कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही परंतू त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन त्यांना जी माहिती पाहिजे आहे तेवढयाच माहितीचे ते शुल्क भरण्यास तयार आहेत. म्हणून प्रथमतः त्यांना माहितीचे निरिक्षण जनमाहिती यांनी करु द्यावे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना कागदपत्रे निरिक्षण करण्यासाठी कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत अपीलार्थीस कार्यालयात बोलवून त्यांना निरिक्षण करु द्यावे. आणि अपीलार्थीकडून माहितीसाठी आवश्यक असेल तेवढे शुल्क घेऊन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरिक्षण करण्यासाठी तारीख व वेळ लेखी कळवावे. आणि अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे. आणि निरिक्षणाअंती आवश्यक असलेल्या प्रतींचे शुल्क भरुन घेऊन जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी शक्य तितक्या लवकर सदरची कागदपत्रे अपीलकर्त्यस उपलब्ध करुन द्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१)

अन्वये माहिती अधिकाराची दखल न घेतल्याबद्यल आणि त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी पार न पाडल्याबद्यल त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

४. सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महिला व बाल विकास पुणे, २८ राणीचा बाग, ओल्ड सर्कीट हाऊसच्या मागे निअर आर.टी.ओ. ऑफीस पुणे यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६०९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जर्नादन गुलाबराव मून<br>केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच<br>७९१, नागसेन वन, नागपूर-१७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त<br>अपंग कल्याण आयुक्तालय, पूणे<br>चर्च रोड पूणे-१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>अपंग कल्याण आयुक्तालय, पूणे<br>ता. जि. पूणे-१. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी अपंग कल्याण आयुक्तालय, पूणे श्री एम. डी. काटवटे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, पूणे श्री एच. आर. कांबळे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०४/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी अपंग कल्याण आयुक्तालय पूणे यांचेकडे अर्ज सादर करुन नागपूर जिल्हयातील अपंगांच्या ज्या शैक्षणिक संस्थांनी आरक्षणाप्रमाणे भरती केलेली नाही त्या संस्थांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीने अपीलार्थीचे समाधान झ ाले नाही म्हणून त्यांनी दि.०८/०२/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी श्री एम. डी. काटवटे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०४/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली त्यामध्ये मागासवर्गीयांच्या अनुशेष पदावर इतर संवर्गातील उमेदवारांची नेमणूक करणे ही नियमबाहय बाब असल्याने अशा नियमबाहय केलेल्या नेमणुकीबाबत योग्य ती कार्यवाही अपंग कल्याण आयुक्तालयाने समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, नागपूर यांना दि.१६/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उप आयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील निकाली काढल्याचे श्री कांबळे उपआयुक्त यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. २९/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली. मात्र समाज कल्याण अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना प्राप्त होणे आवश्यक असल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. म्हणून आयुक्तालयाच्या दि.१६/०९/२०१० च्या पत्रावर समाज कल्याण अधिकारी

यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात समाजकल्याण अधिकारी गट-अ जिल्हा परिषद नागपूर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शक्य तितक्या लवकर त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावा.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६११/नाग/२०११</u>**

१. श्री बळीराम पांडुरंगजी वेलेकर - **अपीलकर्ता**
C/o, प्लॉट क्र. २७, ग्रिन सिटी, गिरड रोड, उमरेड, नागपूर
ता. उमरेड जि. नागपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
विद्या निकेतन, उमरेड
C/o, श्री चिंतामणी अपार्टमेंट, रहाटे ले आऊट, गॅस गोडावून रोड,
आ. ला. वाघमारे शाळेजवळ, उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर.

## (आदेश पारित दिनांक ०२/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, विद्या निकेतन उमरेड श्री वसंत वाघमारे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्य विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री आ. बा. पाटील हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, विद्या निकेतन उमरेड यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये संस्थेद्वारा संचालित चिंचाळा विद्यालय, ता. भिवापूर जि. नागपूर मध्ये शिक्षण सेवक / सहायक शिक्षक यांच्या नियुक्ती व शाळा मंजुरी बाबत १ ते ४२ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतू अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८/०३/२०११ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलार्थीस अद्याप पर्यंत न दिलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी आणि अपीलकर्त्याने भरलेल्या माहितीच्या शुल्काचा आढावा घेऊन अपीलकर्त्यास उर्वरीत माहितीचे शुल्क परत करावे असा प्रथम अपीलाचा आदेश दिला होता. परंतू त्यांना माहितीचे शुल्क परत मिळाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सचिव, विद्या निकेतन उमरेड श्री वाघमारे हे हजर आहेत. तसेच हायस्कुलचे मुख्याध्यापक श्री एस. आर. शंभरकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांच्या वतीने श्रीमती पंतगे अधिक्षक हे हजर होते.

४. जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री वाघमारे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२७/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२८/०१/२०११ ला प्राप्त झाला होता. आणि अपीलकर्त्यास दि.२६/०२/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देखील अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविल्याचे नमुद केले. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतू ४२ मुद्यांपैकी मुद्या क्र.४, ५, ९, १०, १९, ३५, ३७, ३८, ३९ या मुद्यांची अपेक्षित माहिती त्यांना मिळाली नाही तसेच जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्याचे संपूर्ण पेजेस ११ प्राप्त झाले आहेत. त्यामुळे ११ पेजेसचे माहितीचे शुल्क वगळून इतर जे शुल्क त्यांनी भरले आहे ते त्यांना परत मिळावे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतू अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे अद्यापही त्यांना वर नमुद केल्याप्रमाणे अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच त्यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या पेजेसचा आढावा घेऊन त्या पेजेसच्या संबंधातील माहितीचे शुल्क त्यांच्याकडून घेण्यात यावे आणि इतर शुल्क प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया प्रमाणे परत करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्त्यास वर नमुद केलेल्या मुद्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच माहितीचे घेतलेले ज्यादा शुल्क प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे आढावा घेवून अपीलार्थीस परत करावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६१२/नाग/२०११</u>**

१. श्री बळीराम पांडुरंगजी बेलेकर - **अपीलकर्ता**
C/o, प्लॉट क्र. २७, ग्रिन सिटी, गिरड रोड, उमरेड, नागपूर
ता. उमरेड जि. नागपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक - **उत्तरवादी**
चिंचाळा विद्यालय, चिंचाळा
ता. भिवापूर जि. नागपूर.

## (आदेश पारित दिनांक ०२/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चिंचाळा विद्यालय, चिंचाळा ता. भिवापूर जि. नागपूर श्री एस. आर. शंभरकर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचे तर्फे श्रीमती पंतगे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०७/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक चिंचाळा विद्यालय, चिंचाळा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्जान्वये त्यांच्या विद्यालयाची १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. ४ च्या संदर्भात त्यांचे सदस्यत्व केव्हापासून रद्य झाले या विषयीची धर्मदाय उपायुक्त नागपूर यांच्या आदेशाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून दि. २२/०२/२०११ रोजी त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (मा) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चिंचाळा विद्यालय श्री शंभरकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे वतीने श्रीमती पंतगे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०७/०२/२०११ रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि.१७/०२/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.२६/०२/२०११ च्या पत्रान्वये त्याचप्रमाणे प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी दि.०७/०३/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. सदर माहिती ही अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र माहिती अर्जातील मुद्या क्र.४ च्या बाबत त्यांचे नाव कमी झाल्याबाबत धर्मदाय उपायुक्त नागपूर यांच्या आदेशाची प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सांगितले. म्हणून सदर आदेशाची प्रत संस्थेच्या सचिवांनी आयोगापुढे अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली.

४.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०७/०२/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच

धर्मदाय उप आयुक्त यांच्या आदेशाची प्रत देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६१४/नाग/२०११</u>**

१. श्री कैलाश माधवराव धोडरे - **अपीलकर्ता**
मु. रायपूर पो. कुरुळ
ता. चामोर्शी जि. गडचिरोली.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क व औ. सं) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
मध्यवर्ती कार्यालय, वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग मुंबई-४०० ००८

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
मध्यवर्ती कार्यालय, वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग मुंबई-४०० ००८

**(आदेश पारित दिनांक ०२/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२७/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे दि.०४/०७/२०१० ला चंद्रपूर विभागात कंडक्टर या पदाकरिता घेण्यात आलेल्या परिक्षेतील रोल न.

३५८०००४५१६ या क्रमांकाचे पेपरची सत्यप्रत तसेच या क्रमांकाला मिळालेले लेखी परिक्षेतील गूण आणि कंडक्टर या पदाकरिता निवड करण्यात आलेल्या ओ. बी. सी. प्रवर्गातील लेखी परिक्षेचे गुण याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२१/०२/२०११ रोजी महाव्यवस्थापक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व निर्णय देखील दिला नाही म्हणून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी चंद्रपूर श्री के. डी. पल्लडवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या मुंबई कार्यालयाकडे दि.२१/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी मुंबई यांनी अपीलार्थीस दि. १०/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, दि.०४/०७/२०१० रोजी झालेल्या वाहक पदाच्या लेखी परिक्षा संदर्भातील उत्तरपत्रिका या परिक्षा घेणाऱ्या संस्थेच्या ताब्यात असून त्या या कार्यालयाच्या ताब्यात नाहीत. तसेच दिनांक ०४/०७/२०१० रोजी झालेल्या वाहक पदातील चंद्रपूर विभागातील मुलाखती मधील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील अंतिम उमेदवारांचे लेखी व मुलाखती मधील गुण यांची माहिती चंद्रपूर विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलार्थीस कळविले. आणि त्याची प्रत विभाग नियंत्रक, चंद्रपूर यांना पाठविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

त्याला अनुसरुन दि.२६/०७/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास मिळालेल्या लेखी परिक्षेतील गुणांची यादी, ओबीसी प्रवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची व गुण इत्यादी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. दि.२६/०७/२०११ च्या पत्रान्वये तयार केलेली माहिती अपीलार्थीस पोस्टाद्वारे तसेच शिपायामार्फत पाठविण्यात आली होती. मात्र अपीलकर्त्याने सदरची माहिती स्विकारली नाही म्हणून अपीलकर्त्यास स्पीड पोस्टाने ही माहिती पाठविण्यात आल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील शिपायी सदरच्या माहितीचे पाकीट त्यांच्याकडे देण्यासाठी घेऊन आले होते.

परंतू पाकीटातील माहिती पाहूनच ती स्विकारणार आणि पोच देणार असे शिपायास अपीलार्थीने सांगितले. मात्र शिपायाने सदरचे पाकीट फोडण्यास नकार दिला त्यामुळे माहिती स्विकारली नाही आणि पोच दिली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. परंतू आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन दिली आणि ती माहिती अपीलार्थीने स्विकृत केली. मात्र अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, सदर परिक्षेत त्यांनी सोडविलेल्या उत्तर पत्रिकेची प्रत त्यांना पाहिजे आहे. मात्र याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास दिले की, अपीलकर्त्यास त्यांच्या मुख्यालयातून दि.१०/०२/२०११ रोजी वाहक पदाच्या लेखी परिक्षे संदर्भात उत्तर पत्रिका या परिक्षा घेणाऱ्या संस्थेच्या ताब्यात असून त्या त्यांच्या कार्यालयाच्या ताब्यात नाही म्हणून उत्तर पत्रिकेची प्रत अपीलार्थीस आता उपलब्ध करुन देता येत नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या लेखी परिक्षेच्या गुणांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ओ.बी.सी. प्रवर्गात निवड केलेल्या उमेदवारांची यादी व गुण उपलब्ध करुन दिलेले आहे. मात्र अपीलार्थीच्या उत्तर पत्रिकेच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येत नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी ज्या संस्थेने या परिक्षा घेतल्या आहेत त्या संस्थेकडून अपीलकर्त्याने सोडविलेल्या उत्तर पत्रिकेची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी मागवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार नागरीकांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे बंधन हे सार्वजनिक प्राधिकरणावरती टाकलेले आहे ही बाब लक्षात घेता अपीलार्थीने सोडविलेल्या उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचित होईल म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१.  अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी वाहक पदाच्या लेखी परिक्षा ज्या संस्थेने घेतल्या आहेत त्या संस्थेकडून अपीलकर्त्याने सोडविलेल्या उत्तरपत्रिकेची प्रत प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.  त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्त्यास ओ.बी.सी. प्रवर्गातील मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या सर्व उमेदवारांची यादी गुणांसहित उपलब्ध करुन द्यावी. त्यामध्ये प्रामुख्याने अपीलकर्त्याचे नाव असलेली यादी प्रत्येक उमेदवारांच्या गुणासहीत उपलब्ध करुन द्यावी.

३.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६२३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नरेन्द्र प्रसाद (बाबा) भैय्यालालजी बुधोलिया<br>वार्ड नं. १५, पहलेपार १० क्वार्टरमध्ये, सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०३/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २९/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, तहसिल कार्यालय सावनेर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन दि.१६/०८/२०१० ला मा. स्थानिय आमदार

यांच्या जनता दरबारात रॅशन कार्ड मिळणेबाबत अर्ज दिला होता. इतरांना रॅशनकार्ड देण्यात आले मात्र त्यांच्या अर्जावर काय कार्यवाही झाली याबाबतची त्यांनी माहिती मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. ०३/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री पट्टलवार हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार श्री यादव हे हजर आहेत. आणि उपविभागीय अधिकारी सावनेर श्री अरुण गावंडे हे हजर आहेत.

तहसिलदार श्री यादव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने दि.१६/०८/२०१० चा रेशनकार्ड मागणीचा अर्ज मा. आमदार महोदयांच्या जनता दरबारात दिला आहे. मात्र सदर अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. म्हणून अपीलकर्त्यास सदर अर्जाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. त्यानुसार अपीलार्थीने झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या. परंतू नियमानुसार रॅशनकार्ड मागणी साठी जो विहीत नमुन्यात अर्ज करावयाचा आहे त्याची मुळ प्रत त्या अर्जासोबत असणे आवश्यक आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने रॅशनकार्ड मागणीचा विहित नमुन्यातील अर्ज व त्याला आवश्यक असणारी कागदपत्रे दिल्यास कार्यवाही करणे शक्य होईल. याबाबत अपीलकर्त्याने रेशनकार्ड मागणीचा विहित नमुन्यातील अर्ज तहसिलदार यांचेकडे सादर करण्याबाबत आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता यांनी तहसिलदार सावनेर यांच्या कार्यालयाकडे ८ दिवसांचे आत रॅशनकार्ड मागणीचा विहीत नमुन्यातील अर्ज योग्य त्या कागदपत्रांसह सादर करावा आणि सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार सावनेर यांनी अपीलार्थीस ३० दिवसांचे आत रॅशनकार्ड उपलब्ध करुन द्यावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६२४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नरेन्द्र प्रसाद (बाबा) भैय्यालालजी बुधोलिया<br>वार्ड नं. १५, पहलेपार १० क्वार्टरमध्ये, सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय सावनेर यांचेकडे दि.२९/११/२०१० रोजी माहिती अधिकाराचा अर्ज सादर करुन नगर परिषद सावनेर अंतर्गत किती स्ट्रीट लाईटचे पोल सुरु आहेत व बंद आहेत. तसेच गांधी पुतळा ते बाजारचौक व हरीभाऊ आदमने कॉलेज पर्यंतचे ४ महिन्यापासून बंद असलेले स्ट्रीट लाईटला जबाबदार कोण आहेत. आणि स्ट्रीट लाईट देखरेख अधिकारी यांचेवर काय कार्यवाही केली अशी माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना दि.०२/१२/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी कळविले की, आपण माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती दस्तऐवज स्वरुपात नसल्याने सदरची माहिती, माहिती अधिकारा अंतर्गत येत नाही असे त्यांना कळविले म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलात अपीलार्थीस विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी, नगर परिषद सावनेर तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्रीमती अर्चना मेंढे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२९/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची होती तसेच मागितलेल्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज त्यांनी मागितले नव्हते म्हणून अपीलकर्त्यास दि.०२/१२/२०१० च्या पत्रान्वये आपण मागितलेली माहिती दस्तऐवज स्वरुपात नसल्यामुळे माहिती अधिकारा अंतर्गत मोडत नसल्याचे कळविले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मुख्याधिकारी यांनी अपीलार्थीस आकडेवारीच्या स्वरुपात माहिती देण्याचे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१४/०२/२०११ च्या पत्रान्वये आकडेवारीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र रोड डिव्हाईडर वरील लाईट बंद आहेत म्हणून ते सुरु करावे अशी त्यांची मागणी आहे त्यावर मुख्याधिकारी आणि जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, रोड डिव्हाईडरच्या लाईट दुरुस्ती संबंधात जिल्हाधिकारी यांचेकडून नुकतीच त्यांना मान्यता मिळाली आहे त्यामुळे नजीकच्या काळात रोड डिव्हाईडरवरील बंद असलेले लाईट सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत सुनावणीचेवेळी अपीलार्थीचे समाधान झाल्याचे

दिसून आले. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६३३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शंकर भिकाजी धनवलकर<br>मु. पो. चिचोली बु<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>गुरुकुल विद्यालय चिचोली बु.<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक गुरुकुल विद्यालय, चिंचोली बु जि. चंद्रपूर श्री लटारु मन्ने हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर श्री देशपांडे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुरुकुल विद्यालय चिंचोली बुद्रुक श्री मन्ने हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२९/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहिती अर्जात कु. मनिषा रघुनाथ चंद्रागडे बाबत माहिती विचारलेली आहे. त्यामध्ये कु. मनिषा रघुनाथ चंद्रागडे ही शाळेत शिकत होती त्यावेळी दाखल खारीज रजिस्टरमध्ये कोणती जन्मतारीख नोंदविलेली आहे त्यासंबंधित माहिती मागितली आहे. परंतू अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची असल्यामुळे त्याबाबत त्रयस्थ व्यक्तीकडून अभिप्राय मागविण्यात आला. त्यावर कु. मनिषा चंद्रागडे यांनी मुख्याध्यापकांना असे कळविले की, मी, आपल्या शाळेत इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतले आहे त्याचे संपूर्ण रेकॉर्ड आपल्याकडे आहेत. करिता माझी कोणतीही वैयक्तीक माहिती कोणतीही व्यक्ती मागवीत असल्यास मागणारी व्यक्ती ही माझ्या कुठल्याही संबंधित नाही व त्यांच्याशी माझे कुठलेली नाते नाही म्हणून ही माहिती त्यांना दिल्यास माझ्या वैक्तीक जीवनात विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. असे त्रयस्थपक्षाने कळविल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

३. अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. चंद्रपूर यांचेकडे २५/०२/२०११ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०/०३/२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांना अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०७/०४/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलार्थीस सदरची माहिती उपलब्ध करुन दिल्याची पोच त्यांनी आयोगापुढे सादर केली.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६३०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रुपचंद राघोबाजी तांबे<br>गौतम डेकोरेशन जवळ, कळमना रोड, कामठी<br>ता.कामठी जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>सहा. निबंधक, सहकारी संस्था, कामठी<br>प्रशासकीय इमारत, तहसिल कार्यालय कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>सहा. निबंधक, सहकारी संस्था, कामठी<br>प्रशासकीय इमारत, तहसिल कार्यालय कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०४/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. तीजारे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था श्री बेदरकर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. तिजारे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३१/०७/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सह. निबंधक सहकारी संस्था कामठी आणि अध्यक्ष/सचिव, बहुजन हिताय नागरी सहकारी संस्था मर्या. यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सहकारी संस्थांचा कायदा १९६० आणि १९६१ पतसंस्थेच्या आदर्श उपविधीस अधिन राहून पत संस्थेत, सन १९९७ ते माहे जुन २०१० पर्यंत संस्थेच्या वेगवेगळया ठेवी वाटप, कर्ज वाटप संदर्भात उपविधीत कोणत्या तरतुदी आहेत याबाबत व इतर मुद्यांबाबत माहिती मागितली होती. परंतू त्यांना त्यांच्या अपेक्षे प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी सह. निबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे ॲड. तिजारे यांनी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सहा. निबंधक, सहकारी संस्था कामठी, श्री बेदरकर हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झ ाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही बहुजन हिताय या पत संस्थेशी संबंधित असल्यामुळे अर्ज पत संस्थेकडे हस्तांतरीत केला. आणि त्याला अनुसरुन संस्थेकडून अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आली.

४. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये अपीलकर्त्याने जी माहिती मागितली आहे ती बहुतांश माहिती ही उपविधीच्या तरतुदी संदर्भात मागितलेली दिसून येते. म्हणून अपीलार्थीच्या वकीलांशी सुनावणीचेवेळी झालेल्या चर्चेप्रमाणे सहा. निबंधक यांनी अपीलार्थीस संस्थेच्या उपविधीची प्रत व लेखापरिक्षण अहवालाची प्रत संस्थेकडून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सह निबंधक यांनी बहुजन हिताय नागरी पतसंस्था या संस्थेच्या उपविधीची प्रत संस्थेकडून मागवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

त्याचप्रमाणे सह. निबंधक यांनी अपीलार्थीस दि.०१/०४/१९९८ ते ३१/०३/१९९९, १/४/२००० ते ०१/०४/२००१ आणि ०१/०४/२००१-२००२ या वर्षाच्या ऑडिट रिपोर्टच्या प्रती अपीलकर्ता यांचेकडून योग्य ते माहितीचे शुल्क भरुन घेऊन उपलब्ध करुन द्यावे. सदरची माहिती सह निबंधकांनी त्यांच्या कार्यालयाकडे संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६४०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री केशव गोपाळा राऊत<br>मु. पो. नगरधन<br>ता. रामटेक जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं)<br>पंचायत समिती कार्यालय रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत कार्यालय नगरधन<br>ता. रामटेक जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०५/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०५/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत नगरधन श्री एम. ए. कांचनवार तसेच माजी सचिव श्री शंभरकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प) पंचायत समिती रामटेक श्री चव्हाण हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१६/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत नगरधन ता. रामटेक यांचेकडे सुर्यलक्ष्मी कॉटन मिल नगरधन या मिलकडून ग्रामपंचायत कराच्या थकबाकी संदर्भात आणि या कंपनीला बांधकाम परवानगी दिल्याबाबत १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडून दि.०३/०५/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती दि.०४/०५/२०११ रोजी उपलब्ध झाली. मात्र सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाली. तसेच मुद्या क्र. ४ बाबत कंपनीला बांधकामाच्या परवानगीबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून माहिती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत नगरधन श्री कांचनवार हे उपस्थित होते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री चव्हाण हे हजर होते.

विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत नगरधन श्री कांचनवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१६/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणून श्री एम. बी. चरपे हे सचिव म्हणून कार्यरत होते. आणि विद्यमान सचिव, श्री कांचनवार यांनी सचिव पदाचा पदभार दि.०१/०७/२०११ रोजी घेतला आहे. तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री चरपे यांनी अपीलार्थीच्या दि.१६/०९/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.१५/१०/२०१० पर्यंत म्हणजे ३० दिवसांचे मुदतीत माहिती देणे अपेक्षित होते मात्र तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसात अपीलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध केलेली दिसून येत नाही असे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन दिसून येते. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये अपीलार्थीस सात दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. त्यानंतर अपीलकर्त्यास दि.०३/०५/२०११ च्या पत्रान्वये ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत नगरधन यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

४.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.१६/०९/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री चरपे यांनी ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही मात्र त्यानंतर अपीलकर्त्यास दि.०३/०५/२०११ च्या पत्रान्वये ग्राम विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सदरची माहिती ही अपीलकर्त्यास विलंबाने उपलब्ध झालेली दिसून येते. म्हणून या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री चरपे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. तसेच अपीलकर्त्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदर कंपनीला बांधकामाची परवानगी दिली अगर कसे याची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सूर्यलक्ष्मी कॉटन मिल नगरधन या कंपनीला बांधकामाची परवानगी दिली अगर कसे याची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री चरपे यांनी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही . म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. या विलंबास श्री चरपे हे जबाबदार दिसून येतात त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा.

३. सदर निर्णयाची एक प्रत खुलासासाठी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी आणि विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री चरपे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठवावी.

४. या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे खंडविकास अधिकारी, पंचायत समिती रामटेक यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६४१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गिरजाशंकर शिवविलास चौधरी<br>रा. प्लॉट नं.३० गेडाम-ले आऊट, भामटी, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (विकास)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता<br>अभियांत्रिकी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०५/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०५/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता, अभियांत्रिकी विभाग, राष्टसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर श्री ठक्कर आणि श्री मनिष झोडपे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (विकास) राष्टसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर श्री राठोड हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१४/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर  यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. २१/०८/२०१० रोजी ज्युनिअर इंजिनीयर श्री एम. बी. पाटील यांचे विरुध्द तक्रार दिली होती. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपल्या दि.१४/१२/२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन त्या संदर्भात विद्यापीठ अभियंत्यांचे अभिप्राय घेण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठ अभियंतांनी आपल्या व सौ. रंजना ठाकरे यांचे आपसी तक्रारीचे व कोर्टात केस सुरु असल्यामुळे तसेच सदर प्रकरण हे आपसी असल्यामुळे या विभागाशी काहीही संबंध नाही म्हणून आपणास या संबंधित विद्यापीठ अभियंता यांच्या पत्राची प्रत देण्यात येत आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले होते. सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले.

३.	जनमाहिती अधिकारी श्री मनिष झोडपे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या विभागाकडे दि.१६/१२/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने यापूर्वी देखील माहिती अधिकाराखाली माहिती मागितली होती ती माहिती ही अपीलार्थीस वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू अपीलकर्ता यांचा दि. १४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये विद्यापीठ अभियंता यांनी दि.०१/१२/२०१० च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. मात्र अपीलकर्त्याच्या दि.१४/१२/२०१० च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्त्याने त्यांच्या दि.२१/०८/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन कनिष्ठ अभियंता यांनी विद्यापीठ अभियंता यांचेकडे अपीलकर्त्याच्या दि.२१/०८/२०१० च्या तक्रार अर्जा संबंधित अहवाल दिलेला आहे. त्या अहवालाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याला अनुसरुन आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कनिष्ठ अभियंता यांची अपीलार्थीच्या दि.२१/०८/२०१० च्या अर्जावर दिलेल्या अभिप्रायाची प्रत उपलब्ध करुन दिली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि.१४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.१६/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये अभियंतांच्या पत्राची प्रत दिली होती. मात्र अपीलार्थीस त्यांच्या दि.२१/०८/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची प्रत दिलेली नव्हती. परंतू आज आयोगासमोर कनिष्ठ अभियंताच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६४६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री व्ही. के. कोकोडे, केंद्रीय अध्यक्ष (GOEAI)<br>मध्यवर्ती काष्ट भंडार (पोटेगाव रोड) गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०६/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद गडचिरोली यांचे तर्फे श्री ए. पी. वनकर कनिष्ठ सहायक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद गडचिरोली तर्फे कक्ष अधिकारी श्री शिवनकर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०४/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विभाग गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री बी. डी. मडावी मुख्याध्यापक (उच्च श्रेणी) यांच्या निलंबनाबाबत माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१७/०३/२०११ च्या पत्रान्वये आपण मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे पुरविता येत नाही नेमका कोणता दस्तऐवज आपणास आवश्यक आहे ते नमुद करावे जेणेकरुन आपणास माहिती पुरविणे सोईचे होईल असे कळविण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २८/०३/२०११ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जि. प. गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री वनकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०४/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलार्थीने श्री बी. डी. मडावी निलंबीत मुख्याध्यापक यांच्या निलंबनाचा कालावधी वाढविण्यासंबंधित कोणकोणत्या माहितीचा पाठपुरावा केला तसेच निलंबन कालावधी अनधिकृत भत्ता टप्या टप्याने देण्यासंबंधिच्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतू अपीलार्थीने कागदपत्रांच्या स्वरुपात कोणतीही माहिती मागितली नसल्यामुळे माहितीचा बोध झाला नाही म्हणून अपीलकर्त्यास दि.१७/०३/२०११ च्या पत्रान्वये नेमका कोणता दस्तऐवज अपीलार्थीस पाहिजे आहे याबाबत कळविले होते. मात्र अपीलार्थीने कोणताही नेमका दस्तऐवज मागितला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. यावर अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, श्री मडावी हे सद्यस्थितीत निलंबीत आहेत त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सद्यस्थितीत श्री मडावी हे निलंबित असल्यामुळे त्यांचा कालावधी वाढविण्याच्या प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच त्यांना नियमाप्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येत असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. श्री मडावी यांना निलंबन कालावधी मध्ये जो निर्वाह भत्ता देण्यात येत आहे त्या संबंधिच्या नियमांची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी श्री मडावी, निलंबित मुख्याध्यापक यांना निलंबन कालावधीत निर्वाह भत्ता ज्या नियमानुसार देण्यात येत आहे त्याबाबतची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६४९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नेमीचंद सदाराम डोये<br>मु. पो. पिंपळगांव/ खांबी<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पोलीस स्टेशन, अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पोलीस स्टेशन, अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०६/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/०१/२०११ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी, पोलीस ठाणे अर्जुनी /मोर यांचेकडे विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद  मा. श्री पांडुरंग फुंडकर यांचे पत्र जा. क्र. ३४०/०९ च्या पत्रावरुन सहाय्यक उपनिरिक्षक श्री कोडापे यांनी दि.१७/०७/२००९ ला अर्जदाराचे व दि.०९/०९/२००९ ला श्रीराम खोब्रागडे, हिरामन राऊत, हरी राऊत, रविन्द्र ब्राम्हणकर यांचे बयान नोंदविले तसेच दि.११/०९/०९ ला तुलारामजी मारगाये व पुंडलिक ब्राम्हणकर यांचे बयान नोंदविले आहेत त्या बयानाच्या प्रतीची मागणी केली आहे. त्यांना पोलीस उपनिरिक्षक, श्री कोडापे पोलीस ठाणे अर्जुनी /मोर जि. गोंदिया यांचेकडून बयानाच्या प्रती मिळाल्या. परंतू त्यांना अपीलकर्ता तसेच हिरामण राऊत, रविन्द्र ब्राम्हणकर, तुलरामजी मारगाये, नरेन्द्र भिसेन आणि पुंडलीक ब्राम्हणकर इत्यादींच्या बयानाच्या प्रती प्राप्त   झाल्या नाहीत म्हणून त्यांनी  पोलीस ठाणे अर्जुनी /मोर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पोलीस स्टेशन देवरी यांचे वतीने पोलीस उपनिरिक्षक श्री उराडे हे उपस्थित आहेत. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी, पोलीस स्टेशन अर्जुनी/मोर श्री बी. डी. कोडापे, उप निरिक्षक हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले उपनिरिक्षक श्री उराडे यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी हे  उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी हे आहेत. मात्र अपीलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहितीचा अर्ज केलेला नाही. परंतू पोलीस स्टेशन अर्जुनी/मोर येथे म्हणजेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचेकडे अपीलार्थीने माहितीचा अर्ज दाखल केला होता. त्याला अनुसरुन सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री कोडापे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांनी बयानाच्या प्रती मागितल्या होत्या. सदरच्या बयानाच्या प्रती त्यांना पोस्टाद्वारे पाठविलेल्या आहेत आणि सदर प्रती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे काही बयानाच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत त्यावर सहा. जनमाहिती अधिकारी श्री कोडापे यांनी अपीलार्थीस पुन्हा सर्व बयानांच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर मान्य केले.

त्याला अनुसरुन त्यांनी आयोगासमोर सुनावणीचेवेळी सर्व अपेक्षित बयानाच्या प्रती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्या. सदर बयानाच्या प्रती अपीलार्थीने आयोगापुढे स्विकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलार्थीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६४८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिलीप विनायक दोडके<br>C/o, महादेव जिवतोडे, शिवाजी वार्ड, माठेळी नाका, वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>किसान विद्यालय आष्टा<br>ता. भद्रावती जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक किसान विद्यालय, आष्टा ता. भद्रावती जि. चंद्रपूर श्री अनिल दादाजी बिजदुरकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. चंद्रपूर श्री देशपांडे हजर आहेत.

२.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०६/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, किसान विद्यालय आष्टा ता. भद्रावती जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन  माहे जुन २००९ आणि माहे जाने २०११ या दोन महिन्याच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हजेरीपटाची झेरॉक्स प्रत तसेच विद्यालयातील इतर बाबींवर १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलार्थीस अपूर्ण माहिती देण्यात आली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले. त्यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे जबाबदार असल्यामुळे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३.    आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक किसान विद्यालय आष्टा श्री अनिल दादाजी बिजदुरकर हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०६/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. परंतू त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या व्यापामुळे ३० दिवसांचे मुदतीत ते अपीलार्थीस कोणतीही  माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाही मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि.०५/०४/२०११ रोजी  घेण्यात आली आणि सुनावणीचेवेळी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी  म्हणजे दि.०५/०४/२०११ रोजी अपीलार्थीस माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहिती मध्ये मुद्या क्र.८ ची माहिती त्यांना मिळाली नाही. परंतू आज आयोगापुढे अपीलार्थीच्या मुद्या क्र.८ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी तयार करुन आणली आणि आयोगापुढे ती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. अपीलार्थीने सदरची माहिती स्विकृत केली मात्र माहिती देण्याच्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे जबाबदार असल्यामुळे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि.०६/०१/२०११ च्या माहिती अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलार्थीस दि.०५/०४/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच आज सुनावणीचेवेळी मुद्या क्र. ८ ची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली परंतू अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. त्या विलंबाबद्यल मुख्याध्यापकांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, कामकाजाच्या व्यापामुळे ३० दिवसांचे मुदतीत ते माहिती देऊ शकले नाही. मात्र मुख्याध्यापकांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून सदर विलंबास ते जबाबदार असल्याचे दिसून येतात त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्याच्या दि.०६/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन वर नमुद केल्या प्रमाणे ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

सदरच्या शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे दरमहाचे वेतनातुन करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

३. सदरच्या शास्तीची वसूली शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी करावयाची आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६४७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रविन्द्र विनायक जावळेकर<br>जावळेकर निवास, स्वावलंबी शाळेजवळ, धंतोली, वर्धा<br>ता. जि. वर्धा-४४२ ००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>म. रा. विद्युत पोरषण कं. लि.<br>EHV Construction cum O & M Zone<br>इंगोले भवन, झिंगाबाई टाकळी, छिंदवाडा रोड, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>म. रा. विद्युत पोरषण कं. लि.<br>EHV Construction cum O & M Zone<br>इंगोले भवन, झिंगाबाई टाकळी, छिंदवाडा रोड, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३०/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. नागपूर यांचेकडे ४०० KV कोराडी ते वर्धा विद्युत लाईन टाकण्याच्या संदर्भात १ ते १३ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना ३० दिवसांचे मुदतीत अपेक्षीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि.०८/०३/२०११ च्या पत्रान्वये त्यांना माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती ही अपूर्ण व चुकीची असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्रीमती किशोरी मित्रा उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता श्री कावळे आणि अधिक्षक अभियंता श्री बहादुरे हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्रीमती किशोरी मित्रा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.३०/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०३/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही अधिक्षक अभियंता (बांधकाम) नागपूर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून त्यांनी माहिती मागविली. अधिक्षक अभियंत, बांधकाम यांनी सदरची माहिती कार्यकारी अभियंता (वाहिनी बांधकाम) या विभागाशी संबंधित असल्यामुळे दि.०७/१२/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्याकडून माहिती मागविली. आणि कार्यकारी अभियंता, वाहिनी बांधकाम विभाग यांचेकडून जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.२०/०१/२०११ रोजी माहिती पाठविली. तथापी त्यांच्याकडून आलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे पुन्हा त्यांच्याकडून दोन मुद्यांवर त्यांनी माहिती मागविली आणि सदरची माहिती परिपूर्ण रित्या प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि.०८/०३/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झालेली असून अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.०८/०३/२०११ च्या पत्रान्वये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसन येते की, संबंधित विभागाकडे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्यास दिलेली दिसून येते. तथापी सदरची माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे दिसून येते. त्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही संकलीत करण्यास विलंब झ ाला म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि. ३०/११/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०३/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत म्हणजेच दि.०२/०१/२०११ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतू अपीलार्थीस दि.०८/०३/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजेच सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाल्याचे दिसून येते. तसेच या कालावधीत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती बाबत काहीही कळविलेले दिसून येत नाही. म्हणून विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. विलंबाबद्यल त्यांनी वर नमुद केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्रीमती किशोरी मित्रा यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही किंवा माहिती उपलब्ध होण्यास विलंब होईल याबाबत देखील अपीलकर्त्यास काहीही कळविलेले नाही. म्हणून सदर विलंबास जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात म्हणून जनमाहिती अधिकारी श्रीमती किशोरी मित्रा यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही मुख्य अभियंता, किंवा सक्षम अधिकारी विद्युत पारेषण कं. नागपूर यांनी करावयाची आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६५५/नाग/२०११</u>**

१. श्री दादा तुकाराम झोडे - **अपीलकर्ता**
डी-६९/१, एम. एस. ई. बी. कॉलनी, खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर-४४१ १०२.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा The Chief General Manager (HR) - **उत्तरवादी**
प्रकाशगड, २ रा माळा, प्लॉट नं. जी-९,
बांद्रा (पूर्व), मुंबई -४०० ०५१.

३. जनमाहिती अधिकारी तथा The Chief Manager (HR) - **उत्तरवादी**
Maharashtra State Power Generation Company Ltd.
Estrella Batteries Expansion Building,
Dharavi Road, Matunga, Mumbai-४०० ०१९.

**(आदेश पारित दिनांक ०८/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक (HR) महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी, ली. मुंबई श्री सावकार उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी ली. मुंबई श्री मधुकर भोंडवे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक मानव संसाधन महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं. ली. यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन रिट पिटीशन नं. १११७/१९९१, ५५२/१९९१ २१०७/१९९२, २११५/१९९२, २८०७/१९९२ ५५/१९९३ आणि २०७८/१९९३ उच्च न्यायालयात दाखल केले आहेत. या याचिकांची सद्यस्थिती विषयीची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक श्री सावकार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०७/०६/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१९/०६/२०१० रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जात अपीलार्थीने वेगवेगळया सात रिट याचिकांची सद्यस्थितीची माहिती मागितली होती. सदरच्या रिट याचिका या मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे १९९० ते १९९३ या कालावधीच्या होत्या. या याचिकांच्या बाबत सद्यस्थिीची माहिती प्राप्त करण्यासाठी कालावधी लागणार असल्यामुळे जनमाहिती यांनी अपीलार्थीस दि.१७/०७/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, सदरची माहिती काढण्यास एक महिन्याचा कालावधी लागेल आणि सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरच्या रिट याचिका ह्या Kiran K. Gandhi Little & Co. या ॲडव्होकेट ॲण्ड सॉलिसिटर फर्म कडे न्यायालयात त्यांच्या वतीने बाजू मांडण्याचे काम महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनीने दिले होते. म्हणून त्यांच्याकडून याबाबत सद्यस्थितीची माहिती मागितली आणि त्यांना वेळोवेळी पत्र व्यवहार केला. परंतू अद्यापही त्यांच्याकडून वरील रिट याचिकेची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४.	आज आयोगापुढे सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक श्री मधुकर भोंडवे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले होते.

परंतु रिट याचिकांच्या सद्यस्थितीची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध झालेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णय देखील दिलेला नाही.

वास्तवीकपाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक होते परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराला अनुसरुन याबाबतची कोणतीही दखल घेतली नाही म्हणून याबाबत त्यांनी भविष्यात याची पुनरावृत्ती करु नये म्हणून त्यांना समज देण्यात येत आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या रिट याचिकेच्या संदर्भातील सद्यस्थिती ही संबंधित ॲडव्होकेट ॲण्ड सॉलीसीटर फर्म यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संबंधित ॲडव्होकेट ॲण्ड सॉलीसीटर फर्म यांचेकडे संपर्क साधून अपीलार्थीस विनामुल्य माहिती किंवा त्याबाबतची वस्तूस्थिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर** (पी डब्ल्यू पाटील)

**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६५४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुषारकुमार देवेन्द्र चांदेकर<br>शिवाजी वार्ड, शासकीय डी. एड. कॉलेजमागे, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>विश्वमेघ विद्यालय, धर्मापुरी<br>पो. मोरगांव ता. मौदा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१९/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक विश्वमेघ विद्यालय धर्मापुरी ता. मौदा जि. नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर

करुन त्यांच्या नियुक्ती संदर्भात १२ मुद्यांची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्यांच्या राजीनाम्याची प्रत आणि दि.०५/०५/२०१० ला इयत्ता ८ वी ब च्या परिक्षेचा लागलेल्या निकालाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.०६/०३/२०११ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८/०३/२०११ रोजी देण्यात येऊन जनमाहिती अधिकारी यांना अपीलार्थीस १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. त्यानंतरही अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री खोडे हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१९/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नव्हता त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सदरचा माहितीचा अर्ज त्यांनी पोस्टाद्वारे मुख्याध्यापकांकडे पाठविला होता. मात्र सदरचे पाकीट त्यांच्याकडे परत आले म्हणून सदरचा माहितीचा अर्ज मुख्याध्यापकांकडे पोस्टाने गेलेला दिसून येत नाही. तथापी अपीलार्थीने शाळा न्यायाधिकरणाकडे अपील दाखल केले. त्या अपीलाच्या सोबत माहिती अधिकाराचा अर्ज मुख्याध्यापकांकडे दि.२१/०४/२०११ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार त्यांच्याकडे उपलब्ध असलेली १ ते १२ मुद्यांची माहिती पाठविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झ ाल्याचे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या राजिनाम्याची प्रत आणि दि.०५/०५/२०१० ला इयत्ता ८ वी 'ब' च्या लागलेल्या निकालाची प्रत त्यांना मिळालेली नसल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याची सेवा समाप्त झाल्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची प्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापी त्यांना ८ वी 'ब' च्या निकालाची प्रत उपलब्ध करुन दोत येईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

१. अपीलार्थीची सेवासमाप्ती झाल्यामुळे त्यांचा राजिनामा देण्याचा प्रश्न उद्‌भवलेला नाही. असे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

२. दि.०५/०५/२०१० रोजी इयत्ता ८ वी 'ब' च्या लागलेल्या निकालाची सत्यप्रत अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६६४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संपत तुकाराम रामटेके<br>अध्यक्ष, सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया<br>७१२, उत्कर्ष निर्माण, सदर, नागपूर-१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक<br>संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई<br>शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,<br>सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, मुंबई-४०० ००१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई<br>शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,<br>सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, मुंबई-४०० ००१. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०९/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील दि.३०/१२/२०१० चे संदर्भात सिकलसेल रुग्णांना शासकीय व निमशासकीय वैद्यकीय रुग्णालयातील औषधोपचारासांठी तसेच निरिनिराळया वैद्यकीय सुविधांसाठी आणि चाचण्यासांठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहसंचालक यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील दि.३०/१२/२०१० च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या सुविधा ह्या सिकलसेल रुग्णांना मोफत उपलब्ध व्हाव्यात अशी त्यांची मागणी असल्याचे अपीलार्थीने सांगितले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई श्री श्याम भिमराव पाखरे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक यांचे तर्फे मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री परशुराम दोरवे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री पाखरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही राष्ट्रीय ग्रामीण अभियान आरोग्य संचालनालय आरोग्य भवन मुंबई यांचेशी संबंधित असल्याने अपीलार्थीचा माहितीचा अर्ज दि.२३/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे पाठविण्यात आला. व त्याची प्रत अपीलार्थीस पाठवून अपीलार्थीने आरोग्य संचालनालयाकडे संपर्क साधावा असे त्यांना कळविण्यात आले. मात्र राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन मुंबई यांचेकडून दि.३०/०३/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना पत्र लिहून अपीलार्थीने मागितलेली माहिती ही वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या संदर्भात असलेल्या रुग्णालयां संबंधित असल्यामुळे आपणाकडून ही माहिती देणे अभिप्रेत आहे असे कळविण्यात आले. परंतू सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडे

प्राप्त झाले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून सदर पत्राची प्रत अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिली.

त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.०५/०४/२०११ रोजी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्यामध्ये सिकलसेल बाबत संचालनालयातील शाखा 'अ' मार्फत राज्यमध्ये प्रकल्प राबविण्यात येत होता त्याबाबतची सर्व कागदपत्रे, दस्तऐवज, टिपण्या अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्याव्या आणि निरिक्षणानंतर अपीलार्थीस त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या असे नमुद केले असल्याचे श्री परशुराम दोरवे यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून दि.३०/१२/२०१० रोजी शासकीय व निमशासकीय वैद्यकीय रुग्णालयातील औषधोपचारासाठी तसेच निरनिराळया रुग्णांसाठी शासकीय चाचण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कांबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. मात्र या शासन निर्णयात सिकलसेल रुग्णांना शासकीय रुग्णालयात भरती केल्यानंतर त्यांना मोफत वैद्यकीय सुवीधा देणे आवश्यक आहे परंतू दि.३०/१२/२०१० च्या शासन निर्णयात त्याचा उल्लेख नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. त्यावरुन जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, शासनासकडील दि.३०/१२/२०१० च्या शासन निर्णयात सिकलसेल रुग्णांना शासकीय व निमशासकीय वैद्यकीय रुग्णालयात मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणताही उल्लेख केलेला नाही. ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यासाठी अपीलार्थीच्या निवेदनाची प्रत शासनाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या शासनाकडील दि.३०/१२/२०१० च्या शासन निर्णयात शासकीय व निमशासकीय रुग्णालया मार्फत सिकलसेल रुग्णांना देण्यात येणाऱ्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी अपीलार्थीचे आजचे निवेदन शासनाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवावे आणि त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६६५/नाग/२०११**

१. श्री प्रभात लक्ष्मीनारायण दुबे - **अपीलकर्ता**
संपादक 'त्रिकालनेत्र' भगतसिंग वार्ड, देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली -४४१ २०७.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
स्व. श्री लक्ष्मणजी मोटघरे चॅरिटेबल ट्रस्ट नागपूर कार्यालय देसाईगंज
व्दारा-प्राचार्य, स्व श्री ज्ञानेश्वर मेंघरे शिक्षण महाविद्यलाय (B.ed.) वडसा/देसाईगंज
ब्रम्हपुरी रोड देसाईगंज. ता. देसाईगंज जि. गडचिरोली. ४४१२०७.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य - **उत्तरवादी**
स्व. श्री लक्ष्मणजी मोटघरे चॅरिटेबल ट्रस्ट नागपूर कार्यालय देसाईगंज
व्दारा-प्राचार्य, स्व श्री ज्ञानेश्वर मेंघरे शिक्षण महाविद्यलाय (B.ed.) वडसा/देसाईगंज
ब्रम्हपुरी रोड देसाईगंज.
ता. देसाईगंज जि. गडचिरोली. ४४१२०७.

## (आदेश पारित दिनांक ०९/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव यांचे वतीने ॲड. पंकज नवलानी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०७/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, स्वर्गीय श्री ज्ञानेश्वर मोटघरे शिक्षण महाविद्यालय (B.ed.) वडसा/देसाईगंज तसेच डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय व शेवंतादेवी अध्यापक महाविद्यालय यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन वरील तीनही B.ed. D.ed. विज्ञान व गृह विभाग याबाबत सन २००९-२०१० आणि २०१०-२०११ या वर्षाची विद्यार्थी प्रवेश यादी, घेण्यात आलेली प्रवेश फी, घेण्यात आलेले शिक्षण शुल्क, घेण्यात आलेले परिक्षा शुल्क तसेच समाजकल्याण व शिक्षण विभागाकडून या शैक्षणिक सत्रातील प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क, विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीची माहिती विहित नमुन्यात मागितलेली असून याच सत्रातील शिष्यवृत्ती वाटप व परिक्षा शुल्काचे वाटप इ. बाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. परंतू त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव यांचे वतीने अॅड. पंकज नवलानी हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, स्वर्गीय लक्ष्मणजी मोटघरे चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थे मार्फत बी. एड., डी. एड. आणि विज्ञान महाविद्यालय चालविले जाते. तसेच या ट्रस्ट मार्फत जे कॉलेज चालविले जात आहेत. त्या ट्रस्टला किंवा कॉलेजला शासनाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुदान मिळत नाही. सदरचे कॉलेज हे कायम विना अनुदान तत्वावर कार्यरत आहेत असे अॅड नवलानी यांनी सांगितले. आणि मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील रिट पिटिशन नं.५२९४/२००८ मध्ये दि. २८/०४/२००९ रोजी निर्णय दिलेला असून त्या निर्णयात असे नमुद केले आहे की, ज्या ट्रस्टला शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नाही त्या ट्रस्टला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाची प्रत त्यांनी आयोगापुढे दाखविली. त्यावरुन असे दिसून येते की, सदरच्या ट्रस्ट मार्फत जी कॉलेज चालविली जात आहेत त्या ट्रस्टला शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नाही म्हणून या ट्रस्टला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या यकलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५९२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भूषण केशवराव तिजारे<br>मोदी, नागसेन नगर, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष<br>शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी<br>व्दारा-सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी<br>व्दारा-सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०९/०८/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर असून त्यांच्या वतीने ॲड. सुरेन्द्र चिंचलकर व एस. एन. भट्टड हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२९/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी द्वारा सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडे दाखल केलेल्या अपील क्र. ८६९/२००८ मध्ये संस्थेविरुध्द लावण्यात आलेल्या रु. २५०००/- शास्तीच्या रकमेचा भरणा केलेल्या चलनाची प्रत आणि मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्र. ५०६७/२००९ मध्ये लावलेल्या रु. ५०००/- च्या शास्तीच्या रकमेचा भरणा केलेल्या पावतीची प्रत इ. माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१७/०२/२०११ रोजी अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ कामठी जि. नागपूर द्वारा सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने ॲड. भट्टड हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्यानुसार अपीलार्थीस दि.०८/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामध्ये असे नमुद केले की, मा. उच्च न्यायालयाच्या अधीन राहून राज्य माहिती आयोग नागपूर यांनी संस्थेविरुध्द लावण्यात आलेली २५०००/- शास्तीची रक्कम महाविद्यालयाच्या वेतन अनुदानातून कपात करण्यात यावी. तसेच मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र.५०६७/२००९ मध्ये लावलेली रु.५०००/- ची शास्तीची रक्कम सुध्दा महाविद्यालयाच्या वेतन अनुदानातुन कपात करण्यात यावी याबाबतचे पत्र संस्थेने दि.०७/०१/२०११ रोजी सह संचालक उच्च शिक्षण नागपूर यांना पाठविण्यात आले आहे. त्यामुळे सदरच्या रकमेच्या वसूलीची कार्यवाही सह संचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग यांनी करावी म्हणून संस्थेने कळविलेले आहे. याबाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस दि. ०८/०१/२०११ च्या पत्रान्वये कळविलेली असल्याचे ॲड भट्टड यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच उत्तरवादी यांचे वकील यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.०८/०१/२०११ च्या पत्रान्वये शास्तीची रक्कम वसूल करणे बाबत केलेल्या कार्यवाही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७४२/नाग/२०११**

१. श्री देवेन्द्र राघो खोत - **अपीलकर्ता**
फ्लॅट नं. ५०१, उत्कर्ष पारिजात अपार्टमेंट, खरे टाऊन, धरमपेठ नागपूर
ता. जि. नागपूर -४४० ०१०.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक - **उत्तरवादी**
संचालक, नगर रचना व मुल्यांकन विभाग, पुणे
सेंट्रल बिल्डींग पुणे -४११ ००१.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी - **उत्तरवादी**
संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे
सेंट्रल बिल्डींग पुणे -४११ ००१.

**(आदेश पारित दिनांक २५/०८/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग पुणे श्री अ. मा. मुळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक, संचालय नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग पुणे तर्फे नगर रचनाकार श्री संजय व. बारई हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०५/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग पुणे यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि.०७/१२/२०१० च्या सेवेत पुर्नस्थापीत अर्जावर शासनास सादर केलेल्या अभिप्रायाची प्रत त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी उपसंचालक, पुणे यांचेकडे दि.०५/०४/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरणा केले आणि त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू सदर माहिती विलंबाने उपलब्ध झाली म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी श्री मुळे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक यांचे वतीने श्री संजय बारई हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री मुळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०५/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०७/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलार्थीस दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क व स्पिडपोस्टाचा खर्च असे एकूण रु.३२/- भरण्याबाबत पत्र पाठविले होते. परंतू अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचे दि.११/०३/२०११ चे शुलक भरण्याचे पत्र त्यांना पोस्टाद्वारे प्राप्त झाले नाही. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सदरचे दि.११/०३/२०११ चे पत्र अपीलार्थीस पोस्टाद्वारे त्यांच्या पत्त्यावर पाठविल्याबाबतचा जावक नोंदवहीचा पुरावा आयोगासमोर दाखविला. सदर पुराव्यावरुन अपीलार्थीस शुल्क भरण्याचे पत्र पाठविल्याचे दिसून आले. त्यानंतर अपीलकर्त्याने उप संचालक यांचेकडे प्रथम अपील सादर केल्यानंतर त्याची सुनावणी दि.२८/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली परंतू सदर सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर राहिले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दि.०४/०५/२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे नमूद केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांनी दि.१३/०५/२०११ रोजी माहितीचे

शुल्क ई-मनिऑर्डरद्वारे पाठविले. आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१८/०५/२०११ रोजी आवश्यक ती माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु.३२/- भरणे बाबत जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे कळविले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने दि.१३/०५/२०११ रोजी ई-मनिऑर्डरद्वारे माहितीचे शुल्क भरले आणि माहितीचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१८/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६७१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>२७०, चंदन नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर.-९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त<br>परिमंडळ क्र.२ नागपूर शहर.<br>ता. जि. नागपूर-९. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त<br>सदर विभाग, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर श्री अनंत थोरात हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.२ नागपूर यांचे वतीने पोलीस उपनिरिक्षक श्री आर. डी. कोकाटे हे हजर आहेत.

२.     अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२०/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयाुक्त सदर विभाग नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन लघुलेखक श्री वामन तितरमारे व इतर तीन यांचेविरुध्द पोलीस आयुक्त यांचे चौकशी अहवाल दि. ०४/११/२०१० मध्ये संगनमत षडयंत्र दोषी व त्यावर शिक्षा संदर्भात विशेष पोलीस महानिरिक्षक यांचा अहवाल व अपीलकर्त्यची दि.१९/०१/२०११ ची तक्रार दिलेली आहे त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीबाबत १ ते ६ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१८/०२/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.११/०३/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.     जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त सदर विभाग नागपूर श्री अनंत थोरात यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२०/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झ ाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वरिष्ठ पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन सदर नागपूर यांचेशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे सदरचा माहितीचा अर्ज पाठविण्यात येऊन त्यांच्याकडून माहिती मागितली. सदर पोलीस स्टेशनकडून जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती प्राप्त झाली. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१८/०२/२०११ च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन सदर कडून आलेली माहिती पोस्टाद्वारे पाठविली आणि सदर माहिती ही अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना मुद्या क्र.२ व ३ ची माहिती प्राप्त झाली नसल्याचे सांगितले.

४.     अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.२०/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.१८/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू माहिती अर्जातील मुद्या क्र.२ आणि ३ या बाबतचे कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे त्या मुद्यांची वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अर्जातील मुद्या क्र.२ आणि ३ बाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती विनामुल्य कळवावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६७०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पुरुषोत्तम दशरथ चेडूके<br>मु. पो. नवताळा<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार<br>पोलीस स्टेशन भिसी<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन भिसी ता. चिमुर जि. नागपूर श्री एस. एन. ढोबळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर तर्फे श्री रामटेके पोलीस उप निरिक्षक हे हजर आहेत.

२. प्रस्तुत प्रकरणी मा. आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपीलकर्त्याने यापूर्वी याच विषया संदर्भात आयोगाकडे अपील क्र. १४९६/२०१० दाखल केले होते. सदरचा अपीलाचा निर्णय दि.१५/१२/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. म्हणून पुन्हा या विषयाबाबत स्वतंत्र निर्णय देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६७८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अब्दुल हफीज अब्दुल रहमान<br>कादर झेंडा, मशिदीजवळ, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह)<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. वाटकर हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (गृह) नागपूर जिल्हा (ग्रामिण) श्री तिडके हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. वाटकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि.२४/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा रनाळा कामठी ते रनाळा कळमना रोड वर BPC कंपनीचे नवीन पेट्रोलपंप उघडण्याबाबत जिल्हाधिकारी नागपूर यांनी पोलीस विभागाकडून NOC / अभिप्राय मागितला होता. ती NOC किंवा अभिप्राय ह्याची प्रत त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.०५/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण माहिती अधिकारान्वये विचारणा केलेल्या पेट्रोलीयम साठ्या बाबत नाहरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे पाठविण्यात आले असून सदर माहिती आपण जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक नागपूर (ग्रामिण) श्री तिडके हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२४/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२५/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. आणि अपीलार्थीस दि. ०५/०२/२०११ च्या पत्रान्वये सदरचे नाहरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे बाबत कळविले. परंतू जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेले नाहरकत प्रमाणपत्राची कार्यालयीन प्रत उपलब्ध आहे. म्हणून त्याची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६९४/नाग/२०११</u>**

१. श्री राधेश्याम सदाशिव पटिये - **अपीलकर्ता**
३४३, नवि शुक्रवारी, सिमेंट रोड, महाल, नागपूर
ता. जि. नागपूर-३२.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २५/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि.१७/०७/२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर आणि दि.०७/०८/२००९ रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या

कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती मात्र त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र त्यांच्या दि.१७/०७/२००८ रोजी आणि दि.०७/०८/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची मुद्येनिहाय माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री गिरीश जोशी उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२५/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीस त्यांनी दि.२८/०१/२०११ रोजी दिलेल्या पत्रानुसार तहसिलदार मौदा यांचेकडे राजस्व प्रकरण क्रमांक ४३/२०१०-११ मौजा तुमान प्रकरण सुरु असल्याचे कळविण्यात आले. परंतू या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या दि.१७/०७/२००८ चा तक्रार अर्ज आणि दि.०७/०८/२००९ च्या अर्जात संबंधित तलाठयाने केलेल्या फेरफाराच्या नोंदी बाबत त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, संबंधित तलाठयाच्या फेरफाराच्या नोंदी जर चुकीच्या घेतल्या असतील तर त्यावर त्यांच्या कार्यालयाकडे अपीलकर्त्याने रितसर अपील अर्ज दाखल करणे आवश्यक आहे म्हणून या संदर्भात अपीलकर्त्यास योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी संबंधित तलाठी यांना अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण रेकॉर्ड त्यांच्या कार्यालयाकडून मागवून त्या रेकॉर्डची तपासणी करुन अपीलार्थीस योग्य ते मार्गदर्शन करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी संबंधित तलाठी आणि अपीलकर्ता यांना त्यांच्या कार्यालयात रेकॉर्ड पाहणीकरीता बोलवावे आणि त्यांना व्यक्तीशः रेकॉर्डची पाहणी करु द्यावी. रेकॉर्डची पाहणी झाल्यानंतर अपीलकर्त्यास योग्य ते मागदर्शन करावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६९६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ज्ञानेश्वर लहानुजी खानपासोळे<br>C/o, ना.सु.प्र. कॉलोनी, हसनबाग पोलीस चौकी समोर,<br>न्यु नंदनवन ले. आऊट, नागपूर-४४० ००९ . | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक (नगर रचना)<br>नगर रचना विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रचना)<br>नागपूर सुधार प्रन्यास (मुख्यालय), नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासन आदेश

क्र.टि.पी.एस. २४००/१६२८/प्र.क्र. २००/२००० दि.१०/०९/२००१ प्रपत्र ब (६) नंबर वरील (EP-११०) प्रमाणे झालेल्या बदलाबाबत १ ते ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली मात्र सदरच्या माहितीमध्ये १५ टक्के क्षेत्र राखीव ठेवलेल्या जागेच्या नकाशाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि.२१/०३/२०११ रोजी सहा. संचालक नगर रचना यांचेकडे केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०/०४/२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये १० दिवसांचे आत सहाय्यक संचालक अभियंता (रचना) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी अपीलार्थीस मौजा अंबाझरी या जागेचे आकारणीसह अर्जदारास दस्तऐवजाची मागणी केल्यास शुल्क आकारणीसह अर्जदारास दस्तऐवज पुरविण्यात यावेत असे नमुद केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार त्यांना मौजा अंबाझरी या जागेचे नकाशे उपलब्ध झाले मात्र १५ टक्के राखीव ठेवणे बाबत नकाशाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहायक अभियंता यांचे वतीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक नगर रचना, श्रीमती सुनिता अलोणी ह्या आज आयोगापुढे सुनावणी करीता उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१८/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०३/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपण माहितीच्या अर्जात ३ मुद्यांबाबत माहिती अपेक्षीलेली आहे तथापी आपणास नेमकी कोणती पाहिजे आहे त्याचा अर्थबोध होत नाही म्हणून आपण कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. परंतू त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहा. संचालक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलार्थीशी चर्चा करण्यात आली आणि त्यानुसार अपीलार्थीस संबंधित धारिका दाखविण्यात आली आणि त्या धारिकेतील जी कागदपत्रे अपीलकर्त्यास पाहिजे होती ती कागदपत्रे अपीलार्थीस देण्यात आली. सदरची कागदपत्रे अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र प्रपत्र ब मधील शासन आदेश दि.१०/०९/२००१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे EP११० सर्वे नं.६२ आणि ६५ इ. च्या क्षेत्रावर NIT ने मंजूर केलेल्या अभिन्यासात १५ टक्के क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे खुली जागा दर्शवून उर्वरीत प्राथमिक शाळेतील क्षेत्र रहिवास विभागात दर्शविणे

असे नमुद केले आहे. मात्र या १५ टक्के क्षेत्राच्या नकाशाची प्रत त्यांना मिळाली नाही असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले. यावर जनमाहिती अधिकारी यांनी १५ टक्के क्षेत्र खुल्या जागेबाबत आयोगापुढे सांगितले की, शासनाकडील नगर विकास विभागाच्या दि. २७/०२/२००२ च्या आदेशाप्रमाणे आता नियोजन प्राधिकरणात बदल झालेला असून सदरचे नियोजन प्राधिकरण हे नागपूर सुधार प्रन्यासकडे राहिलेले नसून नागपूर महानगर पालिका हे नियोजन प्राधिकरण आहे म्हणून १५ टक्के राखीव क्षेत्राबाबत अपीलकर्त्याने महानगर पालिकेशी संपर्क साधणे योग्य राहील असे सहा. संचालक श्रीमती अलोणी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नागपूर सुधार प्रन्यास ऐवजी नागपूर महानगर पालिका हे नियोजन प्राधिकरण असल्याने १५ टक्के राखीव जागेसाठी नागपूर महानगर पालिकेकडे संपर्क साधणे योग्य राहील असे अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, १५ टक्के क्षेत्र राखीव ठेवण्यासाठी नियोजन प्राधिकरण हे नागपूर महानगर पालिका असल्याने त्यांच्याकडे संपर्क साधावा असे जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे विनामुल्य कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६९५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोज कुमार एस. पंण्डा<br>खटी ओली, आर. बी. स्ट्रीट घर नं. जे-७७७, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर -४४१ ००२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नगर परिषद कामठी<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता<br>नगर परिषद कामठी<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे वतीने श्री एस. आर. कडू कनिष्ठ लिपीक कामठी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन घर क्र. जे

७७८/१ आणि ७७८/२ (शिट क्र.५ संवर्ग ३९) घरमालक  अशोक चावला आणि सुरेश चावला यांचे घर बांधकाम परवानगी आणि जागा या संदर्भात १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून १ ते ४ मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्र. ५ आणि ६ या बाबतची कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी  द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद कामठी यांचे वतीने आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे वतीने श्री एस. आर. कडू हे उपस्थित होते.

श्री एस. आर. कडू यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १२/०१/२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि. १५/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीस दि.२५/०१/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु. ९०/- भरण्याबाबत कळविण्यात  आले. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि.२९/०१/२०११ रोजी भरणा केले आणि अपीलार्थीस दि.०१/०२/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. दि.०१/०२/२०११  च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्या क्र. ५ आणि मुद्या क्र.६ या बाबतची माहिती त्यांना मिळालेली नाही. मुद्या क्र. ५ मध्ये अपीलकर्त्याने तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसते तसेच मुद्या क्र.६ च्या संदर्भात बांधकामाच्या साईट व्हिजिट रिपोर्टची प्रत त्यांनी मागितलेली दिसून येते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र. ५ व ६ च्या संदर्भात माहिती किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र.५ आणि मुद्या क्र.६ ची माहिती किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६९३/नाग/२०११</u>**

१. श्री सुनिल गयाप्रसाद मिश्रा - **अपीलकर्ता**
सेंट्रल इंडिया इन्सिटिट्युट ऑफ मास कम्युनिकेशन,
व्ही. आय. पी. रोड, धरमपेठ, नागपूर- ४४० ०१०.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
ता. जि. अमरावती.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आ. क.) - **उत्तरवादी**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
ता. जि. अमरावती.

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आचार्य पदवी कक्ष) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ श्रीमती सविता मोहोड हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ डॉ. बी. आर. वाघमारे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मा. कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी अपात्र असल्यामुळे राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सेवेतुन बर्खास्त केलेले के.जी. मिसर यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे अवैधरित्या पीएचडी च्या मार्गदर्शक पदावरुन त्वरीत दुर करुन खोटे कागदपत्रांच्या आधारे मार्गदर्शक पद बळकावणारे मिसर यांची पोलीसमध्ये तक्रार करण्याबाबत दि. २३/१०/२०१० ला तक्रार अर्ज दिला त्या तक्रारीवर कुलगुरुंनी कोणते कार्यवाहीचे आदेश दिले याबाबतची त्यांनी माहिती मागितली होती. तथापी त्यांना दि.०७/०२/२०११ च्या पत्रान्वये माहिती अधिकारी यांनी कळविले की, आपण मागणी केलेल्या तारखेची कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली नाही. परंतू त्यांनी सदरची तक्रार ही स्पीडपोस्टाद्वारे पाठविली होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती त्यांना दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (पी एच डी कक्ष) श्रीमती सविता मोहोड उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१०/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. परंतू अपीलार्थीने माहितीच्या अर्जात नमुद केलेला तक्रार अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नव्हता म्हणून दि.०७/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, माहितीच्या अर्जात नमुद केलेल्या तारखेची कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपीलार्थीस तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती पुरविता आली नाही.

त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा अर्ज देखील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलार्थीने असे सांगितले की, प्रथम अपीलाचा अर्ज त्यांनी स्पिडपोस्टद्वारे पाठविला होता. मात्र प्रथम अपीलाचा अर्ज प्रथम

अपीलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. त्यावर अपीलकर्त्याने असे सांगितले की, के. जी. मिसर यांच्या बाबतचा दि.२३/१०/२०१० चा तक्रार अर्ज हा दि.२६/१०/२०१० रोजी पोस्टाने पाठविला होता. म्हणून सदरच्या दि.२३/१०/२०१० च्या तक्रार अर्जाची प्रत जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिल्यास त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगापुढे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यानुसार अपीलकर्त्याने आयोगासमक्ष जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.२३/१०/२०१० च्या तक्रार अर्जाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली म्हणून सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्याकरीता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.२३/१०/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६९८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भिमा चरणदास रामटेके<br>रा. घोट (निंबाळा) पो. घोडपेठ<br>ता. भद्रावती जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती भद्रावती<br>ता. भद्रावती जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत घोटनिंबाळा पो. घोडपेठ<br>ता. भद्रावती जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत घोटनिंबाळा ता. भद्रावती जि. चंद्रपूर श्री एस. एस. आदे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती भद्रावती यांचे वतीने अधिक्षक तथा सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून श्री एस. ए. मिटकर हे हजर आहेत.

२.        अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २४/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव/सरपंच, ग्राम पंचायत घोटनिंबाळा पो. घोडपेठ ता. भद्रावती जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन घोटनिंबाळा ग्राम पंचायत येथील सन २००५ ते २०१० मधील शासकीय अंतर्गत झालेल्या मंजुरीच्या कामाचा नियोजनाचा जमा, खर्च व शिल्लक बाबतची माहिती मागितली होती. त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२८/०२/२०११ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४/०३/२०११ रोजी देण्यात येवून अपीलार्थीस दि.३०/०३/२०११ पर्यंत माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलार्थीस दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली. मात्र सदरच्या माहिती मध्ये सन २००८-२००९ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.        आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत घोट निंबाळा श्री एस. एस. आदे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांचे वतीने श्री मिटकर हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री आदे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू त्यांनी स्वतः या ग्राम पंचायतीचा पद्‌भार नोव्हेंबर २०१० मध्ये घेतला होता. त्यावेळी तत्कालीन सचिव श्री पी. डी. धुर्वे यांनी ग्राम पंचायतचे जमाखर्चाचे वार्षिक अहवाल त्यांच्या पदभारामध्ये उपलब्ध करुन दिलेले नव्हते त्यामुळे वार्षिक अहवाल ग्राम पंचायतीकडे उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविले होते. मात्र त्यानंतर सदर अहवालाचा पंचायत समितीमध्ये शोध घेण्यात आला आणि ते अहवाल पंचायत समिती कार्यालयाकडून सन २००५-२००६ सन २००६-२००७ सन २००७-२००८ आणि २००९-२०१० या वर्षातील वार्षीक अहवाल अपीलार्थीस उपलब्ध करुन दिले. मात्र सन २००८-२००९ चा जमा खर्चाचा वार्षीक अहवाल त्यांना अदयापपर्यंत उपलब्ध झाला नाही म्हणून अपीलार्थीस २००८-२००९ चा वार्षिक अहवाल देता आला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४.	प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांचे वतीने हजर असलेले श्री मिटकर यांनी आयोगापुढे सांगितले की, तत्कालीन सचिव श्री व्ही. डी. धुर्वे यांनी विद्यमान सचिवांना ग्राम पंचायत जमा खर्चाचे कोणतेही रेकॉर्ड दिलेले नाही म्हणून तत्कालीन सचिव श्री धुर्वे यांचे विरुध्द कार्यवाहीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे सादर केलेला आहे. तथापी विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलार्थीस वर नमुद केलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे श्री मिटकर यांनी सांगितले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, तत्कालीन सचिव श्री व्ही. डी. धुर्वे यांनी ग्राम पंचायतीचा जमा खर्चाचा वार्षीक अहवालाचा पदभार विद्यमान सचिवांकडे दिलेला नाही म्हणून संवर्ग विकास अधिकारी यांनी तत्कालीन सचिव श्री धुर्वे यांचेविरुध्द कार्यवाहीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे सादर केल्याचे श्री मिटकर यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये सन २००५-२००६, सन २००६-२००७, सन २००७-२००८ आणि २००९-२०१० या वर्षाचे वार्षिक अहवाल उपलब्ध करुन दिलेले आहे. तथापी २००८-२००९ या वर्षाचा जमाखर्चाचा अहवाल प्राप्त झाल्यास अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत विद्यामन जनमाहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायत कार्यालयामध्ये सन २००८-२००९ च्या वार्षिक अहवालाचा कसून शोध घ्यावा तो प्राप्त झाल्यास त्याची प्रत अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. मात्र कसून शोध घेतल्यानंतरही २००८-२००९ चा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल उपलब्ध न झाल्यास तसे अपीलार्थीस कळवावे.

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री व्ही. डी. धुर्वे यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७०३/नाग/२०११**

१. श्री ॲड. अनिल महादेवराव गोवारदिपे - **अपीलकर्ता**
११, अंबाझरी ले आऊट, धरमपेठ सायन्स कॉलेज मागे, नागपूर
ता. जि. नागपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
सामाजिक न्याय विभाग,
मंत्रालय मुंबई - ३२.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
सामाजिक न्याय विभाग,
मंत्रालय मुंबई-३२.

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय मुंबई श्री एम. एस. कांबळे हजर आहेत. आणि विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्रीमती पुजा उदावंत हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने उपस्थित असलेले श्री योगेश कुंभलकर यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ११/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल अँड एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ नागपूर अंतर्गत स्वामी विवेकानंद वृध्दाश्रम, सावनेर, ता. सावनेर जिल्हा नागपूर या वृध्दाश्रमास केंद्र पुरस्कृत अनुदान मिळणेबाबत सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० पर्यंत राज्यशासनाने शिफारस केल्याचे व संस्थेचे नाव समाविष्ट असलेले पत्र तसेच समाजकल्याण संचालनालय किंवा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषर, नागपूर यांचे शिफारसीसह तपासणी केलेलया अहवालाच्या साक्षांकित प्रती मागितलेल्या होत्या. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून सन २००८-०९ आणि २००९-१० या दोन वर्षातील शिफारस पत्रे प्राप्त झाली. मात्र सन २००५-०६ आणि २००६-०७ आणि २००७-०८ या वर्षाची शिफारस पत्रे त्यांना अद्यापपर्यंत मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.१४/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग मंत्रालय श्री एम. एस. कांबळे हे हजर आहेत. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्रीमती पुजा उदावंत हजर आहेत.

श्रीमती पुजा उदावंत यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.११/१२/२०१० चा माहितीचा अर्ज दि.२१/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितली होती. त्यापैकी जनमाहिती अधिकारी यांचेकडे सन २००८-०९ आणि २००९-१० या वर्षाच्या केंद्र शासनाकडे पाठविलेल्या शिफारसीच्या प्रती उपलब्ध होत्या त्या अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आल्या. मात्र सन २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या तीन वर्षाच्या शासनाकडे पाठवावयाच्या शिफारसीच्या प्रस्तावाच्या प्रती समाज कल्याण पुणे यांचेकडे हस्तांतरीत केल्यामुळे त्यांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे पाठविले जाते. म्हणून या तीन वर्षातील शिफारस पत्रे संचालक पुणे यांचेकडून मागविण्यात आले. परंतू संचालक पूणे यांच्या कार्यालयाकडून ३ वर्षाची शिफारस पत्रे जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाली नाही

त्यामुळे संचालक पुणे यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला. तसेच आज समाज कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे वतीने श्री पवार हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, समाज कल्याण संचालनालय पुणे मार्फत सन २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या कालावधीतील प्रस्तावांचा शोध घेण्यात येत आहे. सदरचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्वरीत अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस सन २००८-०९, २००९-१० या दोन वर्षातील माहिती अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सन २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या तीन वर्षाची माहिती समाज कल्याण संचालनालय पुणे यांचेकडून जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेली दिसून येत नाही. म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी, यांनी समाज कल्याण संचालनालय पूणे यांचे कार्यालयाकडून ३० दिवसांचे मुदतीत माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत विद्यामन जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीस पाहिजे असलेल्या २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या तीन वर्षाची वर्षाची माहिती संचालक, समाज कल्याण पुणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

**PTO**

२.        अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७०१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास दगडू गणेर<br>रनाळा<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>तहसिल कार्यालय कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>तहसिल कार्यालय कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री पोहणेकर हे हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री संजय रामटेके हे हजर आहेत.

३. जनमाहिती अधिकारी श्री पोहणेकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२५/०८/२०१० चा माहितीचा अर्ज तहसिल कार्यालय कामठी यांचेकडे प्राप्त झाला होता. तहसिल कार्यालय कामठी यांचेकडून सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी कामठी श्री पोहणेकर यांचेकडे दि.३०/०८/२०१० रोजी माहिती देण्यासाठी हस्तांतरण करण्यात आली. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती तलाठी रनाळा यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस दि.०७/१०/२०१० रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केली. त्याबाबत जनमाहिती अधिकारी श्री पोहणेकर व नायब तहसिलदार श्री रामटेके यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता श्री रामदास दगडू गणेर यांनी दि. १२/०८/२०११ रोजी मंडळ अधिकारी कामठी यांचेकडे लेखी निवेदन दिले की, त्यांच्या दि.२५/०८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील संपूर्ण माहिती त्यांना मिळालेली असून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या अर्जावर त्यांचा अंगठा देखील नसून कुणी दुसऱ्या इसमाने माझा खोटा अर्ज करुन अपील अर्ज केलेला दिसतो असे अपीलार्थीने लेखी निवेदन दिले असून ते आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी सादर केले आहे. यावरुन असे दिसून येते जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.२५/०८/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच आयोगासमोर दाखविण्यात आली. अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७०२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती बेबी विठ्ठल नारायणे<br>मु. पो. शेगांव (बुज)<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती वरोरा.<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी<br>ग्राम पंचायत शेगांव (बुज)<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ती यांनी दि. ०४/५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांचे वतीने श्री अशोक श्रीराम गायकवाड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीने दि.१८/०२/२००१ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत शेगाव (बुज) ता. वरोरा जि. चंद्रपूर

यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्रीमती कमरुन शेख हुसेन शेख (तुर्की) ग्रामपंचायत सदस्या यांचे जागेवरील बांधकामाबाबत १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती वरोरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी श्री परसुडकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती वरोरा श्री वैरागडे हे हजर आहेत.

विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी श्री परसुडकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दि.१८/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यामध्ये अपीलकर्तीने श्रीमती कमरुन शेख हुसेन शेख (तुर्की) ग्राम पंचायत सदस्या यांचे मकानाचे बांधकामाबाबत माहिती मागितली होती. त्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये पोस्टाद्वारे माहिती पाठविल्याबाबत ग्राम पंचायतचा जावक क्र. १९७/११ दि. ११/०३/२०११ असा असून तो आयोगासमोर दाखविला. परंतू सदरची माहिती अपीलकर्तीस उपलब्ध झालेली नसल्याचे अपीलार्थीचे म्हणणे आहे. म्हणून आज आयोगापुढे अपीलार्थीस विद्यमान जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये पोस्टाद्वारे पाठविलेल्या माहितीची एक ज्यादा प्रत उपलब्ध करुन दिली आणि अपीलकर्तीने ती स्विकृत केली.

४. अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या माहिती अर्जानुसार अपेक्षित माहिती उपलब्ध झ ााल्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७०४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नानाजी जैयदास रामटेके<br>रा. जानबा पो. इटखेडा.<br>ता. अर्जुनी/मोर जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>प्रकाष्ट निष्काशन वनविभाग, नवेगांवबांध<br>जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी<br>भोरंभी टोला<br>जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. आज आयोगापुढे प्रस्तुत सुनावणीकरीता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी भोरंबी / टोला जि. गोंदिया आणि प्रथम अपीलीय अधिकारी प्रकाष्ट निष्काशन वन विभाग नवेगावबांध जि. गोंदिया हे गैरहजर आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. अपीलकर्त्याने आयोगाकडे द्वितीय अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दि.०८/१०/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी भोरंबी / टोला जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत कार्यालय जान्हवा येथील वन जमीन अतिक्रमण लाभ धारकांचे दि.२१/०१/२००९ ला तलाठी व वनरक्षक अधिकारी यांनी ग्राम पंचायत वन अधिकारी यांचे उपस्थितीत सर्व नोंद केली असून ग्राम पंचायतला पंचनामा सादर केला नसल्यामुळे सर्वे नोंद नावाची पंचनामाची नक्कल त्यांनी मागितली आहे. तसेच अपीलकर्ता हे बी.पी.एल. धारक असल्यामुळे त्यांनी बी.पी.एल. चे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडल्याचे नमुद केले आहे. परंतू आज सुनावणीकरीता अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर असल्याने माहिती प्राप्त झाली अगर कसे याची खात्री करता येत नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे ओदश निर्गमित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी भोरंबी/टोला जि. गोंदिया यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कडील दि. ०८/१०/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिली असल्यास तसे आयोगास कळवावे किंवा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास १५ दिवसांचे आत अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६८३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मृणाल संतोषकुमार सोनी<br>रा. महावीर चौक, पुलगांव<br>ता. देवळी जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नगर परिषद पुलगांव<br>ता. देवळी जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक<br>नगर परिषद पुलगांव<br>ता. देवळी जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून रोजी नोटीस काढून दिनांक १८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, नगर परिषद पुलगांव श्री दिलीप लांडगे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद पुलगांव एच. डी. टाकरखेडे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक नगर परिषद पुलगाव यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन वार्ड क्र.२६ प्लॉट क्र. १७४ गुलजारी प्लॉट मालमत्ता ज्यांच्या नावावर हस्तांतरीत झाली आहे त्याबाबत ची कागदपत्रे आणि त्याची टॅक्स पावतीच्या प्रती तसेच टॅक्स वसूलीसाठी दिलेल्या नोटीसीची प्रत त्यांनी मागितली होती. सदरची माहिती १९८२ ते २०११ या कालावधीतील मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून काही माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी श्री लांडगे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१२/११/२०१० चा माहितीचा अर्ज सुधारीत करुन दि.२९/११/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलार्थीस दि.२४/११/२०१० आणि दि. २५/०१/२०११ रोजी पत्र पाठवून माहितीचे शुल्क भरुन घेणे बाबत कळविण्यात आले. तसेच अपीलकर्त्याने दि.०२/०२/२०११ रोजी दस्तऐवजांचे निरिक्षण करुन त्यांच्या मागणीनुसार त्यांनी रु.२८/- च्या माहितीच्या शुल्काचा भरणा करुन त्यांना १० झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन द्यावयाच्या होत्या त्यापैकी त्यांना ८ झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आणि उर्वरीत दोन झेरॉक्स प्रती नगर रचना पुलगाव यांचेकडे प्रलंबीत टॅक्स संबंधित असल्यामुळे त्या उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, वार्ड क्र. २६ मध्ये प्लॉट क्रमांक १७४ सन १९८२ ते २०११ पर्यत कोणाच्या नावावर हस्तांतरण झालेला आहे आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे त्यांना हस्तांतरीत करण्यात आला आहे याची माहिती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे. तसेच टॅक्स वसूलीच्या संदर्भातील संपूर्ण पत्र व्यवहार त्यांना अद्याप मिळालेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही म्हणून आयोगासमोर झालेल्या चर्चे नुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मागितलेल्या माहितीपैकी आणि त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होईल ती माहिती

अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वार्ड क्र.२६ प्लॉट क्र. १७४ च्या मालमत्ता हस्तांतरण बाबत त्यांच्या कार्यालयाकडे ज्या वर्षांची माहिती उपलब्ध होईल ती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी तसेच टॅक्स वसूलीच्या पत्र व्यवहाराबाबतची माहितीही अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७१०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोहन वासुदेव केळकर<br>प्लॉट नं. ९०, उषःकाल बिल्डिंग गांधीनगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४० ०१०. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (प्रशासन)<br>पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग<br>मंत्रालय, मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव<br>पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग<br>मंत्रालय, मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय श्री ध. कु. राठोड हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग मंत्रालय श्रीमती मे. अ. काळे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.०७/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन खालील ४ मुद्यांची माहिती मागितली होती.

१. श्री. म. ता. कांबळे उपसचिव पदुम मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे नावे जमा केलेल्या चल अचल संपत्तीचे विवरण पत्र शासनास नियमाप्रमाणे सादर केले असेल त्यानुसार मार्च १९९९ अखेर च्या संपत्तीचे विवरण देण्यात यावे.

२. श्री म. ता. कांबळे यांचे माहे मार्च २००९ अखेर त्यांच्या भवष्यि निवार्ह निधी खात्यात जमा राशी दर्शविणाऱ्या विवरण पत्राची छायांकित प्रत देण्यात यावी.

३. त्यांचे माहे एप्रिल २००९ पासून मार्च २०१० पर्यंतचे प्रतीमाह त्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा झालेल्या रकमेचे विवरण देण्यात यावे.

४. शासकीय दुग्ध योजना नागपूर येथील विभागीय चौकशी श्री खराबे व इतर सात वर्ष १९९२ प्रकरणी विभागीय चौकशी अधिकारी यांचा अहवाल प्राप्त होऊन १०/१२ वर्ष होवूनही त्या प्रकरणी पुढील कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे नावे पदनामासहीत कळवावी अशी त्यांनी ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्ता यांना मुद्या क्र. ३ ची माहिती उपलब्ध झाली आणि मुद्य क्र.१, २, ४ ची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री राठोड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०७/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयोकडे दि.०९/०२/२०११ रोजी प्राप्त झाला. आणि अपीलकर्त्यास दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये १ ते ४ मुद्यांची माहिती व वसतुस्थिती कळविली. सदरच्या माहितीमध्ये मुद्या क्र.१ बाबत श्री म. ता. कांबळे यांच्या चल-अचल संपतीचे विवरण ही माहिती वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती देता येणार नाही असे अपीलकर्त्यास कळविले आहे. मुद्या क्र. ४ बाबत पदुम ६ कक्षाशी ही माहिती संबंधित आहे असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे आयोगापुढे

सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील सह सचिव यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविल्याचे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ग्राहय धरुन प्रथम अपील निकाली काढले असे मत श्रीमती  काळे यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती बाबत वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. परंतू मुद्या क्र. १ बाबत श्री कांबळे यांचे चल-अचल संपत्तीचे विवरण ही माहिती वैयक्तिक असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असे जे कळविले आहे ते माहिती अधिकाराला विसंगत आहे. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ प्रमाणे माहिती मागणे व ती कलम ७ (१) प्रमाणे उपलब्ध करुन देणे ही एवढीच प्रक्रिया अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणते परिणाम होतील याबाबतचा विचार अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये नाही. त्यामुळे सदरची माहिती ही व्यापक जनहिताच्या दृष्टीने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे शासनाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे सदरची माहिती ही वैयक्तिक असल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही हे म्हणणे ग्राहय धरता येत नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र. १ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल तसेच मुद्या क्र.२ ची माहिती अपीलकर्त्याने महालेखाकार यांचे कार्यालयातुन भविष्य निर्वाह निधीची प्रत उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल तथापी मुद्या क्र. ४ बाबत जनमाहिती अधिकारी यांनी पदुम कक्षाकडे संपर्क साधून त्या मुद्यांची माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.  अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि.०७/०२/२०११ च्या माहिती अर्जातील मुद्या क्र. १ ची माहिती नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच मुद्या क्र. ४ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पदुम ६ कक्षाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७१२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ॲड. एस. एन. कुमार<br>कुमार ॲण्ड कंपनी.<br>पवनसुत, ६ त्रिशरन नगर, खामला टेलिफोन एक्सचेंज जवळ,<br>सोमलवार हायस्कुल रोड, नागपूर-४४० ०२५. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भूमि अभिलेख कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्र.३<br>भूमापन कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर श्री हट्टेकर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख नागपूर श्री सुर्यवंशी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३०/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन कार्यालयीन कार्यपध्दती संबंधित परिपत्रके नियम पुस्तीका व कार्यालयीन कर्मचारी इ. बाबत एकूण १ ते २३ मुद्यांवरती माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.०२/०८/२०१० च्या पत्रान्वये १ ते २३ मुद्यांबाबत उत्तर मिळाले होते परंतू कोणतीही माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले. मात्र जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून न घेता त्यांचे प्रथम अपील खारीज केले म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर श्री हट्टेकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.३०/०६/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०३/०७/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन दि.०२/०८/२०१० च्या पत्रान्वये १ ते २३ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदर माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्येनिहाय चर्चा करण्यात आली. त्यानुसार अपीलकर्त्यास मुद्या क्र.६, ९, १०, १२, १६, १७, २० आणि २३ या मुद्यांची वस्तुस्थिती दर्शक माहिती उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्दा क्र. ६,९,१०,१२,१६,१७,२० आणि २३ इ. ची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७११/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मधुकर बापुरावजी उर्फ चिंधूजी डाखोरे<br>प्लॉट क्र.९, अयोध्यानगर, राममंदीर रोड, नागपूर<br>ता.जि. नागपूर-२४. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय देवळी<br>ता. देवळी जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार देवळी तालुका जि. वर्धा श्री राजेश सरवदे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वर्धा यांच्या वतीने श्री एस. टी. राठोड, नायब तहसिलदार सींदी रेल्वे (तालुका सेलू) हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय देवरी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन तहसिल कार्यालय देवळी जि. वर्धा येथे संजय गांधी निराधार / आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना, इंदिरा गांधी व भुमीहीन शेतमजुर महिला अनुदान योजना व श्रावण बाळ रोजगार योजना (राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना) इ. संदर्भात तलाठया मार्फत केलेल्या चौकशीच्या अहवालाची संपूर्ण कागदपत्रे त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतू चौकशीच्या संदर्भातील त्यांना पाहिजे असलेली कागदपत्रे त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी याबाबतच्या कागदपत्रांच्या निरिक्षणाची आयोगापुढे मागणी केली.

३.	जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री सरोदे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१०/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दि.१९/०१/२०११ रोजी माहिती प्रत्यक्ष उपलब्ध करुन देण्यात आली. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र सदर कागदपत्रांच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे निरिक्षण करण्याची त्यांनी मागणी केली. सदरची कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता लेखी तारीख व वेळ कळववी. अपीलकर्त्याने त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कादपत्रांचे निरिक्षण करुन घ्यावे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७२१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती निर्मला श्यामसुंदर शर्मा<br>पी. डब्ल्यू. डी. रेस्ट हाऊसचे बाजुला, बेद ले आऊट, गोपूरी, वर्धा<br>ता.जि. वर्धा. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता<br>नगर परिषद वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद वर्धा श्री सुधीर जयकुमार फरसोले हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद वर्धा श्री विजय एकनाथ खोराटे हजर आहेत.

२.	अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१४/०९/२०१० जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद वर्धा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जिल्हाधिकारी वर्धा यांचे कार्यालयाकडे तक्रार केली होती. जिल्हाधिकारी वर्धा यांचे कार्यालयाकडून त्यांचेकडील पत्र क्र. अ.का./ नपाप्र/ तक्रार २०१० हा संदर्भ देवून सदरची तक्रार कार्यवाहीसाठी नगर परिषदेकडे पाठविण्यात आली होती. त्या तक्रार अर्जावर नगर परिषदेने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून संबंधित नस्तींचे कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिली. मात्र त्यांच्या तक्रारीवर अंतीम कार्यवाही झालेली नाही म्हणून त्यांनी दि.१३/१२/२०१० रोजी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मुख्याधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे नगर अभियंता यांनी जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती घेतली होती. परंतू त्यांना अंतिम कार्यवाहीची माहिती अदयाप मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी श्री सुधीर फरसोले यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१४/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१७/०९/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्यानुसार अपीलकर्त्यास दि.०८/१०/२०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे केलेल्या तक्रारीचे संदर्भात या कार्यालयात उपलब्ध असलेला रेकॉर्ड बघुन घ्यावा व त्यानुसार हवी असलेली माहिती नियमानुसार फी भरुन उपलब्ध करुन घ्यावी असे नमुद केले. त्यानुसार अपीलकर्ती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि.१३/१०/२०१० रोजी हजर राहिल्या. आणि त्यांना संबंधित नस्तींचे कागदपत्रे दाखविण्यात आली. आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या तक्रार अर्जावर अदयाप पर्यंत कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले.

४.	त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७/०१/२०११ रोजी घेण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलार्थी यांनी जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे केलेल्या तक्रार अर्जावर नगर परिषदेकडून कोणतीच

कार्यवाही अदयापपर्यंत झालेली नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून प्रथम अपील खारीज केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्तीच्या मुळ तक्रार अर्जानुसार नगर अभियंता यांनी अपीलकर्तीच्या जागेवर जावून चौकशी केलेली असून त्या अर्जावरील चौकशी अहवाल मुख्याधिकारी यांचेकडे लवकरच सादर करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आणि त्यानंतर सदरच्या चौकशी अहवालवर घेतलेल्या निर्णयाची माहिती अपीलार्थीस ३० दिवसात उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस कळवावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७१९/नाग/२०११**

१. श्री सज्जाद हुसेन आबिद हुसेन बियाबानी - **अपीलकर्ता**
पंचशिल वार्ड राजुरा
पो. ता. राजुरा जि. चंद्रपूर- ४४२ ९०५.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक २२/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजुरा, जि. चंद्रपूर श्री राऊत हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२२/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजुरा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नागपूर विभाग शिक्षक मतदार संघासाठी फॉर्म नं.१९ निवृत्त असल्यामुळे कोणत्या नियमानुसार रद्य करण्यात आला याबाबतची माहिती व नियम घोषणापत्र व केलेल्या कारवाईचा तपशिल तसेच यासंबंधित केलेल्या तक्रारीची सुनावणीची सत्यप्रत तसेच श्री एन. के. अराळकर, श्री बि. डी. लांडे, श्री सज्जाद हुसेन, श्री एल. टी. खडसे यांनी मतदार होण्यासाठी फॉर्म नं. १९ ची सत्यप्रत, आदेश व नियमावली, घोषणा पत्र, राजपत्रे व श्रीमती नलीनी साळवे यांनी केलेल्या तक्रारीची सत्यप्रत इ. माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली असून अर्ज नामंजूर कोणत्या नियमाने केला. त्या नियमाची त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजुरा श्री राऊत यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि. २१/०१/२०११ रोजी पत्र पाठवून माहितीचे शुल्क रु.२८/- भरणे बाबत अपीलकर्त्यास कळविले. सदरचे पत्र तहसिल कार्यालयातील शिपायासोबत पाठविण्यात आले परंतू अपीलकर्ता यांचे घराला कुलुप असल्यामुळे सदर पत्राची तामील होवू शकली नाही. त्यामुळे उक्त पत्र दि.०१/१२/२०११ ला पाठवून तामील करण्यात आले त्याप्रमाणे अपीलार्थीने माहितीचे शुल्क रु.२८/- चा भरणा केला. आणि त्यादिवशी अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र मतदार नोंदणी अर्जावर नामंजुर कोणत्या नियमाने केले आहेत याबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही तसेच अर्ज नामंजूर करतांना सुनावणीचे कागदपत्रे तसेच रोजनामाच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत असे अपीकर्त्याचे म्हणणे आहे.

त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, शिक्षक मतदार संघासाठी मतदार म्हणून नोंदणी अर्जावर सेवा निवृत्त झाल्यामुळे अर्ज नामंजुर आहे अशी नोंद करण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भात कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही किंवा त्यांचा रोजनामा देखील कार्यालयात उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, शिक्षक मतदार संघासाठी मतदार नोंदणी अर्जावर सेवा निवृत्त झाल्यामुळे अर्ज नामंजूर आहेत अशी नोंद करण्यात आलेली आहे असे स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस कळविणे संयुक्तिक होईल. तसेच अर्ज नामंजूरीच्या संदर्भात कोणतीही सुनावणी घेतली नाही आणि त्याचा रोजनामा देखील कार्यालयात उपलब्ध नाही असे देखील अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजुरा यांनी अपीलकर्त्यास शिक्षक मतदार संघासाठी मतदार म्हणून नोंदणी अर्जावर सेवानिवृत्त झाल्यामुळे अर्ज नामंजूर आहेत अशी नोंद त्या अर्जात करण्यात आलेली आहे तसेच अर्ज नामंजूरीच्या संदर्भात कोणतीही सुनावणी घेण्यात आलेली नसून त्याचा रोजनामा तयार केलेला नाही. त्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलार्थीस स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७१८/नाग/२०११**

१. श्री प्रो. अभयकुमार एम. कुथे - **अपीलकर्ता**
विराज अपार्टमेंट, प्लॉट नं.१२, सुरेन्द्रनगर, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त - **उत्तरवादी**
अमरावती परिमंडळ, अमरावती
ता. जि. अमरावती.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त - **उत्तरवादी**
राजापेठ विभाग, अमरावती
ता. जि. अमरावती.

**(आदेश पारित दिनांक २२/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अमरावती यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन डॉ.

राजेश मुंडे यांचे बयान दि. १६/१२/२०१० रोजी चौकशी पूर्ण झाल्यानंतर घेण्यात आलेल्या त्यांच्या कारणांची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना दि. ०४/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये असे नमुद केले की, सदर अर्ज चौकशी दरम्यान डॉ. विजय कुथे यांचे सहाय्यक डॉ. राजेश मुंडे  हे बाहेरगावी गेले असल्याने त्यांच्याशी फोनवर संपर्क करुन सविस्तर माहिती घेण्यात आली होती. डॉ. राजेश मुंडे हे बाहेर गावावरुन परत आल्यावर त्यांचे बयान घेण्यात आले अशी माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध झाली. मात्र चौकशी पूर्ण झाल्यानंतर सदरचे बयान घेण्यात आल्याचे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त अमरावती शहर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री धोतरे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०२/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये देखील आवश्यक ती माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे  मान्य केले. मात्र त्यांच्याकडे  दिलेल्या बयानावर समक्ष म्हणून कोणतीही माहिती पोलीस अधिकाऱ्यांची सही नाही. त्यानंतर सदरच्या बयानावर पोलीस अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन त्यांना प्रत देण्यात आली. मात्र याचे कारण त्यांना दिलेले नसल्याचे अपीलार्थीने सांगितले.

त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री धोतरे यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, पूर्वी डॉ. मुंडे यांचे बयान घेण्यात आले होते. त्यावेळी नजर चुकीने सदरचे बयान पोलीस अधिकाऱ्यासमोर घेतले गेले, याबाबतची  स्वाक्षरी राहून गेली होती परंतू सदरच्या बयानावर आत पोलीस अधिकारी यांनी समक्ष म्हणून सही केलेली आहे आणि त्या बयानाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, डॉ. मुंडे  यांच्याशी फोनवर याबाबत जी चौकशी केली आहे त्याबाबतची लेखी टिपणी त्यांना मिळावी असे

त्यांनी सुनावणीत स्पष्ट केले. याबाबत कोणतीही लेखी टिपणी त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०४/०३/२०११ च्या पत्रान्वये दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू पूर्वी डॉ. मुंडे यांचे जे बयान घेतले होते त्यवेळी नजर चुकीने सदरचे बयान पोलीस अधिकाऱ्यासमोरन घेतले आहे याबाबत स्वाक्षरी राहून गेली होती. म्हणून आता सदरच्या बयानावर पोलीस अधिकारी यांचे समक्ष म्हणून सही केलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक राहील. तसेच डॉ. मुंडे यांच्याशी फोनवरुन संपर्क करुन सविस्तर माहिती घेण्यता आली होती त्याबाबत कोणतीही लेखी टिपणी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस खालीलप्रमाणे लेखी रजिस्टर पोस्टाने कळवावे.

१) पूर्वी डॉ. मुंडे यांचे बयान घेतले त्यावेळी नजर चुकीने सदरचे बयान पोलीस अधिकाऱ्यासमोर घेतले आहे याबाबत स्वाक्षरी राहून गेली होती. परंतू सदरच्या बयानावर आत पोलीस अधिकारी यांनी समक्ष म्हणून सही केली आहे

२) तसेच या संदर्भात फोन वरुन डॉ. मुंडे यांचेशी संपर्क साधून माहिती घेण्यात आली त्याबाबत कोणतीही लेखी टिपणी कार्यालयात उपलब्ध नाही असे देखील कळवावे.

P.T.O.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७२६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री श्यामराव मोतीराम दहिकार<br>शारदा कॉलनी १३/६, ब्रम्हपुरी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>बांधकाम विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्री एम. आर. कार्लेकर अधिक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम जील्हा परिषद चंद्रपूर श्री भूषण मून हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२१/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे कार्यालयाकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन अभियांतत्रीकी सहाय्यक या पदाबाबत १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती परंतू त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी, बांधकाम विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्री एम. आर. कार्लेकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२१/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०१/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने या माहिती अर्जात एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापी मुद्या क्र. १ आणि मुद्या क्र.२ या संदर्भात मागितलेल्या माहितीचा कोणताही स्पष्ट बोध होत नव्हता म्हणून अपीलार्थीस दि.१५/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. आणि त्या पत्रात मुद्या क्र.१ आणि २ सोबतच मुद्या क्र.३ ते ६ ची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केल्याचे श्री मुन यांनी सांगितले. प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर अपीलार्थीस दि.०१/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे स्पष्ट केले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडील दि.१५/०२/२०११ चे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही परंतू सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पोस्टाने जावक क्र. ४१३-६२२/२०११ दि. १५/०२/२०११ रोजी पाठविल्याचे दिसून येते. म्हणून आज आयोगासमोर अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा दि.१५/०२/२०११ च्या माहितीच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलार्थीने आयोगापुढे स्विकृत केली. तसेच अपीलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि.२५/०९/२००७ च्या आदेशान्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर समान वेतन

श्रेणीत सामावून घेण्याच्या आदेशाची प्रत देखील अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिली. त्या माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७२९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रभाकर मधूकर बावणकर<br>द्वारा श्री क. गो. वरभे, न्यु राष्ट्रीय विदयालयाचे मागे, वडाळा (पैकू)<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर ४४२९०३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद बुलढाणा<br>ता. जि. बुलढाणा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद बुलढाणा<br>ता. जि. बुलढाणा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांचे वतीने श्री वरभे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने हजर असलेले श्री वरभे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन शैक्षणिक सत्र २०१०-११ जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत उच्च माध्यमिक

शिक्षण सेवक भरती माध्यम मराठी संदर्भात १ ते ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. परंतू त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री तेलगोटे हे उपस्थित आहेत त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. ०८/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१४/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने अर्जासोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडले होते. सदरचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र हे श्रीमती बावनकर कमलाताई मधुकर यांचे नावाचे होते. मात्र सदरच्या प्रमाणपत्रावर टिपमध्ये अपीलकर्ता श्री प्रभाकर मधुकर बावनकर यांचे नाव याच कुटुंबात समाविष्ट होते अशी टिप दिलेली आहे. म्हणून सदरचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याचे दाखल करावे असे अपीलकर्त्यास दि.०७/०३/२०११ च्या पत्रान्वये कळविले. परंतू अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याचे पाठविलेले नाही असे शिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर श्री वरभे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस सदरचे पत्र प्राप्त झाले नाही म्हणून याबाबत ते जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणताही खुलासा करु शकले नाही. मात्र शिक्षणाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती त्यांनी संकलीत केली असून सदरच्या माहितीची एक प्रत त्यांनी आता सोबत आणलेली आहे. म्हणून त्यांनी सदरची माहिती अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेले श्री वरभे यांनी आयोगापुढे स्विकृत केली. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७२७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रभाकर मधूकर बावणकर<br>द्वारा श्री क. गो. वरंभे, न्यु राष्ट्रीय विदयालयाचे मागे, वडाळा (पैकू)<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर ४४२९०३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती चिमुर<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पंचायत समिती चिमुर<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांचे वतीने श्री कवडुजी वरंभे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने हजर असलेले श्री वरंभे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२३/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती चिमुर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन लेखनवाचन धडक मोहिम सन २००६ ते २००८ या निकाला संदर्भात अ,ब,क या मुद्यांमध्ये

माहिती मागितली होती. तसेच कु. वर्षा कवडुजी वरंभे यांच्या दि.०५/११/२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी दि.०४/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री आर. डी. ढोले आणि विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक श्री विशाल यादव हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्री मेश्राम हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री विशाल यादव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२३/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२४/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने अपीलार्थीस दि.०४/१२/२०१० च्या पत्रान्वये दारिद्रय रेषेखालील दाखला नसल्यामुळे सदर माहिती विनामुल्य मिळणार नाही असे कळविण्यात आले त्यानुसार संबंधितांनी दि.१४/१२/२०१० ला कुटुंब ओळख क्र.१७८३७ असून कुटुंबाचे सदस्य असल्याचा दाखला नमुद केल्याचे सादर केले. त्या आधारे अपीलकर्त्यास सदर माहिती दि.२९/१२/२०१० च्या पत्राने विनामुल्य वास्तव्याच्या ठिकाणी पोस्टाद्वारे पाठविण्यात आली. आणि ती अपीलार्थीस प्राप्त देखील झाली परंतू सदर माहिती ही अपूर्ण असल्याचे अपीलकर्त्याच्या वतीने हजर असलेले श्री वरंभे यांनी सांगितले. तसेच कु. वर्षा वरंभे यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही असेही त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, कु. वर्षा वरंभे चा अर्ज गटशिक्षणाधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नाही म्हणून यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. आणि त्या संदर्भात गटशिक्षणाधिकारी यांचे कडील दि.१८/१२/२०१० च्या पत्राची प्रत देखील श्री वरंभे यांना आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. तसेच सदरची माहिती ही सभेमध्ये संकलीत करण्यात येत असते. त्यामुळे सदरची माहिती कार्यालयातील आवक नोंद वहीमध्ये नोंदली जात नाही त्यामुळे आवक नोंदवहीच्या झेरॉक्स प्रती अपीलार्थीस उपलब्ध करुन देता येत नाही असे देखील जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता श्री प्रभाकर बावनकर हे माहिती अधिकाराखाली अर्ज करतात परंतू प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी ते कधीही उपस्थित झाले नाही म्हणून सदर बाब ही संदिग्ध असून श्री प्रभाकर बावणकर मार्फत श्री वरंभे हे माहिती मागत असतात व प्रत्यक्षात ते हजर राहत नाही असे देखील त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून तसे लेखी सादर केले. म्हणून अशा प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने दारिद्रय रेषेखालील दाखल केलेल्या दाखल्याची सत्यता पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी भविष्यात अशा प्रकारच्या दारिद्रय रेषेखालील दाखल्यांची पडताळणी करणे अपेक्षित आहे. तथापी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. २९/१२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र सदरची माहिती मासीक सभेमध्ये संकलीत करण्यात येते. त्यामुळे त्याची नोंद कार्यालयातील आवक नोंदवहीत करण्यात येत नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, अपीलकर्त्यास दि.२९/१२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली माहिती ही मासीक सभेत संकलीत करण्यात येते त्यामुळे कार्यालयातील आवक नोंदवही मध्ये याबाबतची नोंद केली जात नाही. त्यामुळे अपीलार्थीस सदरच्या नोंदवहीची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देता येत नाही.

२.    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७२८/नाग/२०११</u>**

१. श्री प्रभाकर मधूकर बावणकर - **अपीलकर्ता**
द्वारा श्री क. गो. वरंभे, न्यु राष्ट्रीय विदयालयाचे मागे, वडाळा (पैकू)
ता. चिमुर जि. चंद्रपूर ४४२९०३.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा.

**(आदेश पारित दिनांक २३/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांचे वतीने श्री वरंभे हे हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने हजर असलेले श्री वरंभे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद

बुलढाणा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासन निर्णय क्र.पअंक १००९/प्र. क्र.२००/२००९/ १६अ मंत्रालय मुंबई दि.२७ ऑक्टोबर २००९ अंतर्गत पदवीधर अंशकालीन उमेदवार समांतर आरक्षण अंतर्गत जिल्हा परिषद बुलढाणा येथे देण्यात आलेल्या नियुक्त्यां संदर्भात माहिती मागितली होती. सदर माहितीचा अर्ज त्यांनी पोस्टाद्वारे पाठविल्याचे सांगितले. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी दि.२३/०३/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलढाणा हे आज आयोगापुढे सुनावणीस हजर झाले नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणात त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे केलेले दिसते. तसेच प्रस्तुत प्रकरणात जे प्रथम अपीलीय अधिकारी असतील ते देखील उपस्थित झाले नाही. म्हणून त्यांचे देखील म्हणणे ऐकून घेता आले नाही. परंतू अपीलकर्ता यांनी दि.०८/०२/२०११ रोजी माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि.०८/०२/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. तसेच जनमिहती अधिकारी यांनी अपीलार्थीस विहीत मुदतीत माहिती का उपलब्ध करुन दिली नाही यांचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७३७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती सुनंदा दत्तात्रय अरमरकर<br>तर्फे श्री दिलीप द. अरमरकर<br>रा. रेशीमबाग, प्लॉट नं. ६८, गजानन महाराजांचे पाठीमागे<br>कारपोरेशन शाळेजवळ, नागपूर. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>विभागीय कृषी सह संचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर<br>नवीन प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>विभागीय कृषी सह संचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर<br>नवीन प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती यांचे तर्फे श्री दिलीप अरमरकर हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी विभागीय सह संचालक कार्यालय, नागपूर श्री ए. एन. शेंडे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी विभागीय कृषी सह संचालक कार्यालय नागपूर श्री आर. बी. चलवदे हे हजर आहेत.

२.    अपीलकर्ती यांचे वतीने हजर असलेले श्री अरमरकर यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी विभागीय कृषी सह संचालक कार्यालय नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री डी. बी. अरमरकर कृषी विभागातील बडतर्फ वरिष्ठ लिपीक यांचे दि.२५/०५/१९८४ च्या बडतर्फीच्या आदेशाच्या संदर्भाने माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली. परंतू  दि.२५/०५/१९८४ च्या आदेशा प्रमाणे वेतन व भत्ते हे अटी व शर्ती प्रमाणे देण्यात येत नाही याबाबतची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३.    जनमाहिती अधिकारी श्री शेंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री चलोदे हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी श्री शेंडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२८/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस सदरची माहिती दि.२३/०२/२०११ रोजी पाठविण्यात आली. तसेच कृषी आयुक्तालय पुणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती देखील अपीलकर्त्यास दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील असा निर्णय दिला. त्याप्रमाणे अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाले आणि उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्या त्यांना निरिक्षणासाठी देण्यात आल्या आणि निरिक्षणानंतर त्यांना पाहिजे असलेली माहिती पुन्हा उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडील दि.२३/०२/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र दि. २५/०५/१९८४ च्या बडतर्फीच्या आदेशानंतर देण्यात आलेले वेतन व भत्त्यांची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की, श्री डी. बी. अरमरकर यांना दि.२५/०५/१९८४ च्या बडतर्फी आदेशानंतर

अदा केलेल्या रकमांचा तपशिल अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल आणि त्या शिवाय इतर रकमा देण्यात आलेल्या नाहीत असेही अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री डी. बी. अरमरकर यांना दि.२५/०५/१९८४ च्या बडतर्फीच्या आदेशानंतर ज्या रक्कम दिल्या आहेत त्या रकमांचा तपशिल कळवावा आणि त्या रकमांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही रक्कम दिल्या नाहीत असे स्पष्टपणे लेखी कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७३६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संतोषकुमार नामदेव शेडमाके<br>रा. गौरक्षण वार्ड, एफ. डि.सि.एम. कॉलनी, टाईप ११/६७, बल्लारपूर<br>ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक<br>एफ. डि.सि.एम. लिमिटेड, बल्लापरपूर<br>ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक<br>मध्य चांदा वन प्रकल्प विभाग, बल्लारपूर,<br>ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक, मध्य चांदा वन प्रकल्प विभाग, बल्लारपूर जि. चंद्रपूर श्री ठाकूर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, एफ.डि.सी.एम. लि. बल्लारपूर जि. चंद्रपूर श्री एम. ए. घोषाल हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक, मध्य चांदा वन प्रकल्प विभाग बल्लारपूर ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन गायत्री टिंबर बल्लारपूर यांनी मागील ३ वर्षात आपल्या डेपोतून लाकूड खरेदी करुन परस्पर विक्री केली असता आपल्या काष्ट भांडारातून परस्पर माल उचलला त्याबाबत सोबतचे प्रपत्र 'अ' आणि प्रपत्र 'ब' यामध्ये त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर त्यांना प्रपत्र 'अ' ची माहिती प्राप्त झाली. परंतू 'ब' ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी श्री ठाकुर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१५/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १७/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती वन परिक्षेत्र अधिकारी झरण/कन्हाळ/गाव/टोहगाव यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती मागितली आणि त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. परंतू अपीलार्थीने प्रथम अपील विभागीय व्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. विभागीय व्यवस्थापकांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि.१०/०१/२०११ रोजी घेतली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३/०१/२०११ रोजी देण्यात आल्याचे श्री घोषाल यांनी आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती ती माहिती दि.१७/०१/२०११ रोजी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु.८७/- भरण्याबाबत पत्र दिले. अपीलकर्त्याने दि.२८/०१/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले आणि अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र प्रपत्र 'ब' ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रपत्र 'ब' मधील माहिती संकलीत करण्यास बराचसा कालावधी लागला आणि आता सदरची माहिती देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास देण्यासाठी उपलब्ध करुन घेतलेली आहे. म्हणून त्यांनी सदरची माहिती आयोगापुढे अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगापुढे

स्विकृत केली. अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७४३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>२७०, चंदन नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उपअधिक्षक<br>विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालय, नागपूर परक्षित्र, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालय, नागपूर परक्षित्र, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री एल. एस. कांबळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधिक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र श्री डी. जी. मसराम हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/०३/२०११ रोजी जमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालय नागपूर यांच्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि.११/०३/२०११ च्या बदली धोरणभंगाची तक्रार अर्जावर केलेली कार्यवाहीची माहिती मागितली होती त्यांना काही माहिती प्राप्त झाली आणि राहिलेली माहिती त्यांना दोन दिवसात जनमाहिती अधिकारी हे उपलब्ध करुन देणार असल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर सुनावणीकरीता उपस्थित असलेले श्री कांबळे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक श्री मसराम यांनी सांगितले की, अपीलकर्त्यास त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी काही मुद्यांची माहिती दोन दिवसात उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरु आहे असे त्यांनी सांगितले.

३.	प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या संमतीने असा निर्णय घेण्यात आला की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दोन दिवसात राहिलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. म्हणून दोघांच्या संमतीने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून पुन्हा दोन दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास राहिलेल्या मुद्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७४५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सारंग भाऊराव दाभेकर<br>गांधी वार्ड, चिमुर<br>पो. ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २५/०८/२०११)

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांच्या तर्फे नायब तहसिलदार श्री ए. एस. खांडरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या तर्फे श्री खंडाळे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे तर्फे श्री ए. एस. खांडरे नायब तहसिलदार तहसिल कार्यालय चंद्रपूर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांचे वतीने श्री खंडाळे नायब तहसिलदार हे हजर आहेत.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे वतीने उपस्थित असलेले नायब तहसिलदार श्री ए. एस. खांडरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. १३/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जात अपीलकर्त्याने मौजा झरीपेठ ता.जि. चंद्रपूर येथील वन हक्क समितीने सादर केलेल्या, उपविभागीय स्तर समितीने मंजूर केलेल्या वन हक्काचे वैयक्तिक दावे तसेच वन हक्क समितीला दिलेल्या अनुदाना बाबतची माहिती प्रत्यक्षात तपासावयाची असल्याने तपासणीचा दिवस, तारीख, वेळ कळवावी आणि वरील माहितीसह अडेगाव व चोरगाव मंजूर दाव्यांची सत्यप्रत मागितली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांनी अपीलकर्त्यास दि.२५/०१/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन वनहक्क अधिनियमांच्या मंजूर दाव्यांच्या तपासणी बाबतचे अर्ज या कार्यालयात उपलब्ध असून आपण दि.०२/०२/२०११ रोजी ठिक १२.०० वाजता हजर राहून संबंधित रेकॉर्ड तपासणीकरीता आपणास उपलब्ध करुन देता येतील, असे लेखी कळविले होते. आणि सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दि.२७/०१/२०११ रोजी प्राप्त झाल्याची पोच नायब तहसिलदार श्री खांडरे यांनी आयोगापुढे दाखविली. मात्र अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात रेकॉर्डच्या तपासणीकरीता आले नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले नाही असे श्री खंडाळे नायब तहसिलदार यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले नायब तहसिलदार श्री खांडरे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री खंडाळे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.१३/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास वनहक्क दाव्यांचे दस्तऐवजांची तपासणी करण्यासाडी दि. ०२/०२/२०११ रोजी १२.०० वाजता त्यांच्या कार्यालयात

बोलविले होते. परंतू अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाले नाही. तसेच अदयाप पर्यंत देखील ते रेकॉर्डच्या तपासणी करीता हजर झाले नाही किंवा संपर्क सुध्दा दिलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास रेकॉर्डच्या निरिक्षणाची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.६८८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विष्णु लक्ष्मणजी कसारे<br>मु. पो. मिंडाळा<br>ता. नागभिड जि. चंद्रपूर-४४१ २०५. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २९/०८/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली

अर्ज सादर करुन अपीलकर्ता श्री विष्णू लक्ष्मण कासारे यांची सहा. शिक्षक पदावर नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागितली होती. परंतू त्यांना विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.१६/०३/२०११ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी श्री पोडचलवार हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२९/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक संत हरदास विद्यालय मिंडाळा ता. नागभिड यांचेशी संबंधित असल्याने जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०३/०१/२०११ च्या पत्रान्वये सदरच्या माहिती अर्जाची प्रत त्यांच्याकडे पाठवून अपीलकर्त्यस माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले व त्याची प्रत अपीलकर्ता यांना देवून मुख्याध्यापक हे जनमाहिती असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१०/०५/२०११ रोजी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.११/०५/२०११ रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद करण्यात आले की, मुख्याध्यापक यांनी माहितीचा तात्काळ शोध घेवून उपलब्ध झालेली माहिती १५ दिवसात अर्जदारास उपलब्ध करुन द्यावी. परंतू त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलार्थीने सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दि.११/०५/२०११ च्या दिलेल्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संबंधित मुख्याध्यापकाकडून १५ दिवसात प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संबंधित मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. परंतू मुख्याध्यापकांनी माहिती उपलब्ध न करुन दिल्यास त्यांच्याविरुध्द शिक्षणाधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही प्रस्तावीत करावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७५४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री करण सिंग रमेश गौर<br>कार्पोरेशन कॉलनी, प्लॉट नं. ३-ए, टाईप-बी,<br>नार्थ अंबाझरी रोड, नागपूर-४४० ०१०. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यलाय व रुगणालय (मेयो), नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यलाय व रुगणालय (मेयो), नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २९/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्रीमती

विमल चंद्रभान काळे यांचेवर केलेल्या औषधोपचाराची माहिती आणि एम. एल. सी. केसची १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. १४/०२/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.२, ३, ४, ५ आणि ७ ची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. १ आणि ६ ची माहिती त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम ८ प्रमाणे माहिती प्रकट करता येत नाही असे कळविल्यामुळे त्यांना या दोन मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता श्रीमती नाल्लेवार उपस्थित आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक डॉ. खामगावकर हजर आहेत.

जनमिाहती अधिकारी श्रीमती नाल्लेवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१२/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही शल्य चिकित्सा शास्त्र विभाग त्याचप्रमाणे प्रभारी अधिकारी वैद्यकीय अभिलेख विभाग आणि निवासी वैद्यकीय अधिकारी यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून दि. १८/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती मागितली आणि त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये शल्य चिकित्सा शास्त्र विभाग यांचेकडून माहिती प्राप्त झाली. आणि दि. २७/०१/२०११ च्या पत्रान्वये इंचार्ज बर्नवार्ड विभागाकडून माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि.१४/१२/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र मुद्या क्र. १ आणि ६ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती अर्जातील मुद्या क्र. १ व ६ ची माहिती श्रीमती विमल च. काळे यांच्या एम. एल. सी. केसची असल्यामुळे सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८ प्रमाणे प्रकट करता येत नाही असे त्यांनी सांगितले. मात्र माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम ८ चे अवलोकन केले असता एम. एल. सी. केसच्या संदर्भात माहिती प्रकट करता येत नाही असे कुठेही दिसून येत नाही. वास्तवीक पाहता एखाद्या रुग्णावरती केलेल्या औषधोपचाराची माहिती प्रकट केल्यास त्यामध्ये पारदर्शकता दिसून येते म्हणून सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे

आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना संबंधित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ आणि मुद्दा क्र.६ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७५६/नाग/२०११, ७५७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेश नवलकिशोर ठाकुर<br>विशाखा निवास, अजयनगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४० ०३३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी<br>पंचायत समिती हिंगणा<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत पेंढरी (देवळी)<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ४. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत कवडस<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | | |

**(आदेश पारित दिनांक २९/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये वर नमुद केलेली दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. प्रस्तुत दोनही अपीलांमध्ये माहितीचा विषय हा एकच असल्यामुळे आणि अपीलकर्ता देखील एकच असल्यामुळे दोनही अपीलाची सुनावणी एकत्र घेण्यात आली.

**अपील क्र. ७५६/२०११ -** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक ग्राम पंचायत पेंढरी (देवळी) यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत पेंढरी बाबत १ ते १६ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना ३० दिवसात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१६/०५/२०११ रोजी घेण्यात आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि.३१/०५/२०११ रोजी त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत पेंढरी श्री एस. सी. देशभ्रतार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०१/०३/२०११ चा माहितीचा अर्ज ग्राम पंचायत कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरचा अर्ज त्यांनी ग्राम पंचायतीचा शिपाई यांचेकडे दिला होता. परंतू कामच्या व्यस्ततेमुळे शिपायाने सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिलेला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतू ग्राम पंचायत कर्मचारी यांचेवर नियंत्रण ग्राम सेवकाचे असल्यामुळे माहितीच्या अर्जाची दखल ग्राम सेवकाने घेणे आवश्यक होते. तथापी याबाबत ग्राम सेवकाला खुलासा विचारला असता त्यांनी सांगितले की, ग्राम पंचायतीचे कार्य बाहुल्यामुळे अपीार्थीस ३० दिवसात ते माहिती उपलब्ध करु शकले नाही. मात्र त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. विस्तार अधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलार्थीस दि.३१/०५/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. दि.३१/०५/२०११ रोजी अपीलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे  जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी अशी मागणी यांनी आयोगापुढे केली.

४.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. ०१/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.३१/०५/२०११ रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली परंतू ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणजेच विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. म्हणून सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे जबाबदार दिसून येतात. विलंबाबद्यल त्यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, ग्रामपंचायतीचे कार्यबाहुल्यामुळे ते ३० दिवसात अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देवू शकले नाही. परंतू जनमाहिती अधिकारी यांचा हा खुलासा मान्य करण्यासारखा नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) प्रमाणे अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**५.	<u>अपील क्र. ७५७/२०११</u> :-**	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि. ०१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत कवडस या ग्राम पंचायती बाबत १ ते १६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांचा माहितीचा अर्ज पंचायत समिती कडून ग्रामसेवक कवडस ग्राम पंचायत यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यात आला. मात्र ३० दिवसांचे मुदतीत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन दि.२०/०५/२०११ रोजी निर्णय देण्यात आला. त्या निर्णयात अपीलार्थीस विनामुल्य माहिती देण्याचे आदेश दिले. तथापी त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती आजपावेतो मिळालेली नाही म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकरी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

६.	आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री एस. टी. वाटकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री अंजनकर हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री वाटकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०१/०३/२०११ चा माहितीचा अर्ज पंचायत समिती हिंगणा यांचेकडून त्यांच्या कार्यालयाकडे दि.०४/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. परंतू कार्यबाहुल्यामुळे ते ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस माहिती देऊन शकले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

७. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१६/०५/२०११ रोजी घेण्यात आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. २०/०५/२०११ रोजी देण्यात येवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी श्री आंजनगावकर यांनी सांगितले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचे वडील आजारी असल्यामुळे त्यांच्या आजारात ते व्यस्त होते तसेच ग्राम पंचायतीच्या इतर काम काजातही ते व्यस्त होते. म्हणून अपीलार्थीस अदयापपर्यंत ते माहिती देवू शकले नाही. तथापी अपीलार्थीस ८ दिवसात विनामुल्य माहिती देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

८. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि. ०१/०३/२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक यांचेकडे दि. ०४/०३/२०११ रोजी प्राप्त झालेला दिसून येतो. परंतू ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०/०५/२०११ रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये देखील अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याचा निर्णय देण्यात आला. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून माहिती उपलब्ध होण्याच्या विलंबाकरीताही ते जबाबदार दिसतात म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ७५६/२०११ आणि अपील क्र. ७५७/२०११ ही दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पेंढरी आणि जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कवडस यांनी अपीलकर्त्यास दि.०१/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून विलंबाबद्यल दोनही जनमाहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये प्रत्येकी रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

२. सदरच्या शास्तीची वसूली संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांनी वर नमुद केलेल्या दोनही जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहाचे वेतनातून प्रत्येकी रु.५०००/- वसूल करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". मध्ये जमा करावी.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७६४/नाग/२०११</u>**

१. श्री छत्रपती उध्दव खोब्रागडे - **अपीलकर्ता**
द्वारा शंकर बागेसर, राजमंगल कार्यालयाजवळ, घुटकाळा वार्ड, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
भुविज्ञान व खनिकर्म प्रादेशिक उपसंचालक कार्यालय, रामनगर, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
भुविज्ञान व खनिकर्म प्रादेशिक उपसंचालक कार्यालय, रामनगर, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक ३०/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, भूविज्ञान आणि खनिकर्म प्रादेशिक उप संचालनालय कार्यालय चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नोव्हेंबर २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील ड्रिलींग मशीन, पंप, ट्रक, जिप सुटेभाग (पार्ट) खरेदीची व दुरुस्ती खर्चाच्या बिलांची तसेच टिपणीची साक्षांकित सत्यप्रत मिळण्याची माहिती मागितलेली आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आला. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अनिल कदम तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री सूर्यकांत बढे हे आज आयोगापुढे उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक श्री सादिकले हे उपस्थित आहेत.

तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अनिल कदम यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदर माहितीच्या अर्जात ड्रिलींग मशीन, पंप, ट्रक, जिप सुटेभाग (पार्ट) खरेदीची व दुरुस्ती खर्चाच्या बिलांची तसेच टिपणीची साक्षांकित सत्यप्रतआणि जुने सुटे भाग बदली केल्याबाबत आणि दुरुस्ती केल्यानंतर योजना अहवालाची प्रत त्याबाबत एकत्रीत केलेल्या खर्चाची माहिती मागितली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या

कार्यालयात संकलीत करण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.१०/०२/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्रान्वये कळविले. त्याला अनुसरुन अपीलार्थीने माहितीचे शुल्क दि. २५/०२/२०११ रोजी भरणा केले. आणि त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२५/०२/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तसेच सुटे भाग बदलविल्यानंतर जुने सुटे भाग यांची नोंद शासनाने

विहीत केलेल्या नोंदणी पुस्तकात त्याची नोंद करण्यात येते म्हणून त्याबाबतच्या प्रती त्यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दुरुस्ती नंतर योजना अधिकाऱ्यांच्या अहवालाबाबत त्यांनी आयोगापुढे सांगितले की, कोणत्याही यंत्राच्या दुरुस्तीनंतर जो यंत्रचालक आहे त्याचा दुरुस्तीचा अहवाल घेण्यात येत असतो मात्र योजना अधिकाऱ्याचा दुरुस्तीचा अहवाल काढण्याची कार्यपध्दती त्यांच्या कार्यालयात नाही. ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या सुनावणीचे वेळी निदर्शनास आणून दिल्याचे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.१५/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन माहितीचे शुल्क भरुन घेऊन दि. २५/०२/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी दि.२५/०२/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात आयोगापुढे चर्चा करण्यात आली. त्यावरुन असे निदर्शनास येते की, सुटेभाग बदलविल्या नंतर जुने सुटे भाग भांडारात जमा करण्या संदर्भात नोंदीच्या रजिस्टरच्या प्रती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्या आहेत. मात्र कोणत्याही यंत्र दुरुस्ती नंतर त्या यंत्राच्या दुरुस्ती बाबत योजना अधिकाऱ्याचा अहवाल घेण्यात येत नसतो अशी माहिती स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होइल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, कोणत्याही यंत्राच्या दुरुस्ती बाबत यंत्रचालकाचा अहवाल घेण्यात येत असतो. मात्र योजना अधिकाऱ्यांचा दुरुस्ती अहवाल घेण्याची पध्दत नाही असे स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य अपीलार्थीस व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**